श्री साईनाथ समर्थ.

# श्री साईलीला

मासिक पुस्तक.

वर्ष १० अंक १०-११ ] पौष-माघ [ श. १८५५

नलिनीदलगतजलमतितरलम् । तद्वज्जीवितमतिशयचपलम्



क्षणमपि सज्जनसंगतिरेका । भवति भवार्णवतरणे नौका

—शंकराचार्य.

संपादक: रामचंद्र आत्माराम तर्खड.

# अनुक्रमणिका


| | पृष्ठें |
|---|---|
| शंभर नंबराच्याही पलीकडील दक्षिणा ... ... | १-१६ |
| पत्रव्यवहार ... ... ... ... | १-८ |
| अनुभव ... ... ... ... | ९-२० |
| श्री जोड साईमहाराज शिर्डी येथील शके १८५५ आषाढी पौर्णिमेबद्दल उत्सवासंबंधीं खर्च ... ... | २१-२५ |
| श्री गुरुपौर्णिमेच्या उत्सवासाठीं आलेल्या वर्गणीची नांववार यादी ... ... ... | २५-२८ |
| श्रीसंतकथामृत अध्याय २२, २३, २४, २५ आणि २६ ... | १६५-१८४ |


## विनंति.

वर्गणीदारांस नम्र विनंती करण्यांत येत आहे कीं, या सालीं V. P. करण्यांत आली नसल्यामुळें ज्यांनीं वर्गणी अद्यापी पाठविली नाहीं त्यांनीं कृपा करून ती खालील पत्त्यावर पाठवून द्यावी. अथवा V. P. करण्याचें सुचवावें.

**रा. आ. तर्खड,**
व्यवस्थापक—**श्रीसाईलीला**
५१ E. पार्ला रोड, खार, मुंबई २१; आणि ऑ. खजिनदार,
**श्रीसाईबाबा शिरडी संस्थान.**

सुप्रसिद्ध श्री. मोरोपंत कविकृत **केकावलि** या भक्तिरसप्रेमामृतनें ओथंबलेल्या काव्यावर कै. रा. ब. दादोबा पांडुरंग यांची "यशोदा पांडुरंगी" टीका जी साठ वर्षांपूर्वी छापून प्रसिद्ध झाली होती व आजमितीस अत्यंत दुर्मिळ झाली होती तिची दुसरी आवृत्ति छापून तयार झाली आहे. किं. रु.२

**रा. आ. तर्खड,**
व्यवस्थापक—**श्रीसाईलीला कचेरी.**

## श्रीसाईभक्तांस विज्ञप्ति.

कोणाला श्रीसाईमहाराजांबद्दलचे त्यांचे स्वतःचे अनुभव श्रीसाईलीलेंत प्रसिद्ध व्हावे म्हणून पाठविण्याचे असतील त्यांनीं ते आमचेकडे पाठविल्यास ते प्रसिद्ध होण्याबद्दल आदरपूर्वक योग्य तो विचार होईल.

**रा. आ तर्खड,**
—प्रकाशक.

# शंभर नंबराच्याही पलीकडील दक्षिणा

( मागील अंकावरून समाप्त )

आतां आपण चित्ताकडे वळूं. प्रथम त्याच्या थोरवीकडे वळून नंतर त्याच्या अर्थत्वाचा विचार करूं.

जशीं पंचमहाभूतें, पंच ज्ञानेंद्रियें, पंच कर्मेंद्रियें, तसेंच अंतःकरणपंचकही आहे. या अंतःकरण-पंचकास कोणी अंतःकरण-चतुष्टयही म्हणतात. या अंतः-करण–चतुष्टयांत, मन, बुद्धि, चित्त व अहंकार या चार तत्त्वांचा समावेश होतो. संकल्प विकल्प करणारें तें मन. तेंच मन निश्चित स्वरूपास पोंचलें म्हणजे तेंच बुद्धिरूप धारण करतें. त्याच बुद्धीचें निश्चित कार्यावर लक्ष लागलें म्हणजे मनाच्याच त्या वृत्तीला चित्त असें म्हणतात. व तीच मनाची वृत्ति कार्यप्रवृत्त झाली म्हणजे त्याच वृत्तीला अहंकार असें म्हणतात.

परंतु, या अंतःकरण-चतुष्टयांतील चार तत्त्वांपैकीं बहुतेक ठिकाणीं मन, बुद्धि व अहंकार या तीन तत्त्वांचाच उल्लेख येतो. चित्ताचा उल्लेख फार करून येत नाहीं.

भूमिरापोऽनलो वायुः । खं मनोबुद्धिरेवच ।
अहंकार इतीयं मे । भिन्ना प्रकृतिरष्टधा ॥ श्री. भ. गी. अ. ७, श्लो. ४

या वरील अष्टधा प्रकृतीचे वर्णनांत चित्ताचा उल्लेख नाहीं. तसेंच,

महाभूतान्यहंकारो । बुद्धिरव्यक्त मेवच ।
इंद्रियाणि दशैकंच । पंचचेंद्रिय गोचराः ॥ श्री.भ.गी.अ.१३, श्लो. ५

या वरील ३६ विकारात्मक क्षेत्रवर्णनांतही चित्ताचा उल्लेख नाहीं. तसेंच,

इंद्रियाणि पराण्याहुः । इंद्रियेभ्यः परं मनः ।
मनसस्तु पराबुद्धिः । यो बुद्धेःपरतस्तुसः ॥ श्री.भ.गी.अ.३, श्लो.४२

या वरील श्रेष्ठ परंपरेंतही चित्ताचा उल्लेख नाहीं. त्याचप्रमाणें

कायेन वाचा मनसेंद्रियैर्वा । बुद्ध्यात्मना वा प्रकृति स्वभावात् ।

या श्लोकांतही चित्ताचा उल्लेख नाहीं. परंतु, श्रीनाथमहाराजांनीं या श्लोका-वरील आपल्या भाष्यांत चित्ताचा स्पष्ट उल्लेख करून त्याचें अनुपमेय महत्त्वही वर्णन केलें आहे.

श्रीनाथमहाराज म्हणतात:

भागवतधर्माची निजस्थिती । मन, बुद्धी, चित्त अहंकृती ।
आदी करूनि इंद्रियवृत्ती । भगवंतीं अर्पिजे तें एक ॥ ३४९ ॥
म्हणौनी मनना मीचि मनन । स्मरणा मीचि नित्य स्मरण ।
चित्तासी मी निज चिंतन । चिंत्यधर्मेंवीण सर्वदा ॥ ४१७ ॥
ज्यासी सहसा प्राप्ती नव्हे । तें तें निजचित्तें चिंतावें ।
तंव अप्राप्तीसीचि प्राप्ती पावे । चित्त निजानुभवें सहज भजत ॥ ४१८ ॥
तेव्हां निश्चितें जें जें चिंती चित्त । तें तें स्वयेंचि होय समस्त ।
या प्रतीती चित्त भजत । ब्रह्मार्पणयुक्त निजबोधें ॥ ४१९ ॥
नाथिलें चिंती तें अतिचिंता । आथिलें चिंति तें निश्चितता ।

आथी नाथी सांडूनि चित्ता । सहजें न भजतां भजन होय ॥ ४२० ॥

वरील ओव्यांवरून, "कायेन वाचा" या श्रीमद्भागवतांतील श्लोकांत व उपरि-निर्दिष्ट श्रीमद्भगवद्गीतेच्या निरनिराळ्या तीन अध्यायांतील तीन श्लोकांत स्पष्ट उल्लेखित नसलेल्या पण गर्भित असलेल्या चित्ताचा नाथांनी "कायेन वाचा" या श्लोकावरील आपल्या भाष्यांत स्पष्टपणें उल्लेख करून, तेंच परमात्मप्राप्तीस कारण आहे हें वरील ४१८ व्या ओवींत दाखवून, त्याची थोरवी वर्णन केली आहे.

श्रीनाथांनी जशी परमात्मप्राप्तीकरितां चित्ताची आवश्यकता व थोरवी वर्णन केली, तशीच भगवान श्रीज्ञानेश्वर महाराजांनींही आपल्या चित्ताकर्षक व अमोघ वाणीत वर्णन केली आहे:—

भगवान् श्रीज्ञानेश्वरमाऊली म्हणतात.

तैसी संकल्पविकल्पाची वोढी । सांडूनि रजतमाची कावडी ।
भोगितां निजधर्माची आवडी । बुद्धी उरे ॥ ७७ ॥
इंद्रियवर्गी दाखविलिया । विरुद्धा अथवा भलिया ।
विस्मय कांहीं केलीया । नुठी चित्ती ॥ ७८ ॥

गांवा गेलिया वल्लभ । पतिव्रतेचा विरह क्षोभ ।
मळतेसणी हानी लाभ । न मनी जेवी ॥ ७९ ॥
तेवीं सत्सरूप रुचलेपणें । बुद्धीचें ऐसें **अनन्य** होणें ।
तें सत्वशुद्धी म्हणें । केशिहंता ॥८०॥श्री.ज्ञानेश्वरी अ. १६, श्लो.१

तमोगुण, अहंकार व संकल्पविकल्पात्मक रजोगुण मन या दोहोंची खांद्यावर (निष्कारण ) घेतलेली कावड ( ओझें ) टाकून देऊन, स्वधर्माची म्हणजे आत्मस्वरूप भोगण्याची आवड ज्या वृत्तींत उरते ती सात्विक बुद्धि, आतां या बुद्धीला इंद्रियांनी प्रिय किंवा अप्रिय विषय दाखविले किंवा तिच्यापुढें प्रत्यक्ष आणून ठेविले, तरी प्रिय विषयांचें ग्रहण किंवा अप्रिय विषयाचा त्याग; या विकारास ज्या बुद्धीजवळ जागाच मिळत नाहीं, असें जें बुद्धीचें स्वरूप किंवा अनन्यगतिकत्व तें शुद्धसत्त्व चित्त. पति गांवास गेल्यामुळें उत्पन्न झालेल्या विरहाच्या तळमळींत कितीही नुकसान किंवा फायदा झाला, तरी त्याकडे पतिव्रता स्त्रीचें लक्ष नसून तें जसें तिच्या पतीकडे असतें, त्याप्रमाणें आत्मस्वरूपाची रुचि लागल्यामुळें परंतु आत्मसाक्षात्कार किंवा परमात्मप्राप्ति होत नसल्यामुळें,म्हणजे परमात्मारूपि पतीचे विरहजन्य तळमळीमुळें, सत्त्वगुणसंभूत कितीही ज्ञान व सुख होत असलें, तरी त्याकडे बुद्धीचें लक्ष नसून तें जेव्हा अनन्यगतिक होतें म्हणजे परमात्म्याकडे लागतें, तेव्हां तिच्या या वृत्तीस सत्वशुद्धि किंवा शुद्धसत्व चित्त असें म्हणतात, असें केशिहंता श्रीकृष्ण परमात्मा सांगतात.

बुद्धि अनन्य येणें योगें । मजमाजीं जैं रिगे ।
तैं चित्त चैत्य त्यागें । माते चि भजे ॥ ६७ ॥
ऐसें चैत्यजातें सांडिलें । चित्त माझ्याठायी जडलें ।
ठाके तैसें वहिलें । सर्वदा करी ॥ ६८ ॥
मग अभिन्ना इया सेवा । चित्त मियांचि भरेल जेव्हां ।
माझा प्रसाद जाण तेव्हां । संपूर्ण जाहला ॥ ६९ ॥

श्री. ज्ञा. अ. १८, श्लो. ५७. ५८

सांसारिक विषयांचे विचार करण्याचें व्यभिचारित्व सोडून देऊन,अव्यभिचार किंवा पातिव्रत्यवृत्तीनें, बुद्धीनें परमात्मस्वरूपाचा निश्चय केला, म्हणजे ती अनन्य झाली, व ती अनन्य झाली म्हणजे तिला चित्त हें नांव प्राप्त होतें. बुद्धीला चित्तत्व प्राप्त झाल्यावांचून परमात्मप्राप्ति नाहीं. पण चित्ताच्या ठिकाणचें चैत्य म्हणजे त्याच्या ठिकाणीं असलेले नऊ विक्षेप व आधिभौतिक, आधिदैविक, आध्यात्मिक दुःख, दौर्मनस्य ( इच्छाभंग ) श्वासविकार व शरीरकंप इत्यादि अंतराय ( विघ्नें ) यांचा नाश झाल्यावांचून त्याला शुद्धसत्त्वत्व प्राप्त होत नाहीं, व शुद्धसत्त्वत्व प्राप्त झाल्यावांचून त्याला परमात्मस्वरूपाच सारखा रात्रंदिवस निदिध्यास लागत नाहीं, व तसा त्याला अखंडचिंतनाच ध्यास लागल्यावांचून तें परमात्मप्राप्ति करून देण्यास समर्थ होत नाहीं

( पातंजल योगसूत्र, पान ३०-३१ नानाभाई रेळे

याप्रमाणें चित्ताच्या चैत्याचा त्याग झाला, म्हणजे चित्त परमात्म्याचें अखंड चिंतन करतें व या चिंतनानें परमात्म्याची अभिन्न सेवा झाली,म्हणजे चि परमात्मरूप होतें व तें परमात्मरूप झालें म्हणजे तोच परमात्म्याचा पूर्ण प्रसाद अशी जी चित्ताची वृत्ति हाच तीन गुणांपलीकडील शुद्ध सत्व गुण, व हा दैवी संपत्तीच्या २६ गुणांपैकीं दुसरा गुण आहे.

याप्रमाणें श्रीज्ञानेश्वरमाउलींनीं चित्ताची उपयुक्तता, थोरवी व मह गाइलें आहे.

वैदिक वाङ्मयांतही आत्मप्राप्तीकरतां चित्तालाच अग्रस्थान दि दिसतें. प्रख्यात मननीय, व माननीय दशोपनिषद्रत्नापैकीं सर्वांगसुंदर अ बृहदारण्यकोपनिषदांत ऋषिशार्दूल श्रीयाज्ञवल्क्य ब्रह्मनिष्ठांनीं आपल्या प पूज्य, पतिपरायण सती मैत्रेयी भार्येला जो अमोल उपदेश केला आहे, त्यांत आत्मप्राप्तीकरतां शुद्धसत्त्व चित्तानें आत्म्याचें ज्ञान करून घेऊन, नंतर त्य श्रवण, मनन व निदिध्यासन म्हणजे अखंड चिंतन करावे असें सांगून चित महत्त्व वर्णिलें आहे.

आत्मा वा अरे द्रष्टव्यः, श्रोतव्यः, मंतव्यः, निदिध्यासितव्यः

बृ. उ. अध्याय २, ब्राह्मण ४ कंडिका ४–५

या ठिकाणीं निदिध्यासितव्यः याचा अर्थ अखंड चिंतितव्यः असा आहे.

चित्त हा पातंजल योगसूत्रांचा तर आधारस्तंभच आहे. चित्तवृत्ति-निरोध म्हणजे योग, ही पातंजलसूत्रांतील योगाची व्याख्या आहे.

" योगश्चित्तवृत्ति निरोधः " हें पातंजल सूत्रांतील दुसरेंच सूत्र आहे.

( पान ३ नानाभाई रेळे प्रकाशित )

योगांत चित्ताला अग्रस्थान देऊन चित्त हेंच परमात्मप्राप्तीचें साधन आहे, असें म्हटलें आहे. कित्येक वेळां निकट सान्निध्यामुळें चित्त हाच आत्मा असा मोठमोठ्या तत्त्ववेत्त्या योग्यांस व ज्ञान्यांस भ्रम होतो व तसा भ्रम सौगत बुद्धास झालाही होता. —पातंजल योगसूत्र २३ विभूति पार.

आधुनिक गीर्वाणभाषाविभूषण कविरत्न कै. श्री. विठोबाआण्णा दप्तरदार यांनी आपल्या प्रख्यात " सुश्लोक लाघव " नामक पुस्तकांत चित्ताची थोरवी व महति अत्यंत कुशलतेनें व श्लेषानें वर्णन केलीं आहे.

आण्णा म्हणतात.

अनुष्टुभवृत्तम्

रे रे चित्त त्यज द्वैतम् । त्यमेकत्वं समाश्रय ।
ततश्चासि चिदेवत्वम् । नात्र कार्याविचारणा ॥१६२॥

श्लोक द्व्यर्थी आहे.

पहिला सरळ अर्थ:—अरे बावा चित्ता, तूं द्वैत टाकून दे ( मी, तूं, ईश्वर, जग वगैरे वगैरे ) व एकत्वाचा म्हणजे अद्वितीय परमात्म्याचा आश्रय कर व असा आश्रय केलास म्हणजे तूं परमात्माच आहेस (असें तुला कळून येईल) यांत (दुसरा तिसरा) विचार करण्याचें कारण नाहीं.

दुसरा श्लेषार्थ:—(श्लेष हा साहित्यशास्त्रांतील अलंकारांपैकीं एक उत्तम अलंकार आहे.) अरे बावा, चित्ता, तुझ्याजवळ जें एक दुसऱ्या "त" चें गाठोडें ( द्वैत ) आहे (चित्त या शब्दांत "चित् + त" असे दोन "त" आहेत

त्यांपैकीं दुसरा "त") तें तूं फेंकून दे व फक्त एकच "त्" चा आश्रय कर, म्हणजे तूं "चित्" ( म्हणजे चैतन्य म्हणजे परमात्मा ) स्वरूप आहेस ( असें कळून येईल ) यांत ( दुसरा तिसरा ) विचार करण्याचें मुळींच कारण नाहीं.

यावरून चित्ताच्या ठिकाणचे "त" संज्ञक विक्षेपादि दोष नाहींसे झाले म्हणजे तेंच चित्त परमात्मरूप होतें; अतएव चित्ताची महती अतर्क्य आहे, असें आण्णानीं स्पष्टपणें दाखविलें आहे.

असो. याप्रमाणें श्रीनाथमहाराजांनीं "कायेन वाचा" या श्रीमद्भागवतांतील श्लोकांत व उपरिनिर्दिष्ट श्रीमद्भगवद्गीतेंतील तीन श्लोकांत स्पष्ट रीतीनें उल्लेखित नसलेल्या पण त्यांत अंतर्भूत असलेल्या चित्ताचें वर्णन आपल्या भाष्यांत कां केलें, व त्यास किती महत्त्व व कोणतें स्थान दिलें, तसेंच भगवान् ज्ञानेश्वरमाउली, ब्रह्मनिष्ठ मुनिवर्य याज्ञवल्क्य, भगवान् योगेश्वर पतंजली व आधुनिक गीर्वाण कविरत्न आण्णा दप्तरदार वगैरे मोठमोठ्या महाशयांनीं चित्ताच्या अनुपमेय सामर्थ्याचें जें वर्णन केलें, त्याचें येथपर्यंत विवेचन केलें व त्यावरून चित्त हा बुद्धि व परमात्मा यांमधील अत्यंत महत्त्वाचा दुवा आहे असें उघड सिद्ध होतें.

आतां चित्त हें अर्धें कां, याचा विचार करूं. चित्ताला अर्धें कोणीच म्हटलें नाहीं. नाथभाष्यांत चित्त अर्धें आहे असा उल्लेख नाहीं. श्रीज्ञानेश्वरींत तसा स्पष्ट खुलासा नाहीं, उपनिषदांत नाहीं, विठोबाअण्णा म्हणत नाहींत. पातंजलसूत्रांत उल्लेख नाहीं. मग चित्त हें अर्धें असें कशावरून म्हणावें ? व तसें म्हटल्यावांचून बाबांच्या १६॥ रुपयांची संगती लागत नाहीं. बाबांची वाणी तर निःसंशय अमोघ.

नातरी चतुराननाचिये वाचे । काय असती लटकिया अक्षरांचे साचे॥२०८

श्री. ज्ञा. अ. ११, ओ. २०८

ब्रह्मदेवाच्या वाचेंत खोट्या अक्षरांचे ठसे असतात कीं काय ? नसतात; त्याप्रमाणें ब्रह्मदेवाच्याही पलीकडील पूर्ण परब्रह्म बाबांची वाचा

हातैव त्रिकालाबाधित सत्यमयच असणार. तिच्यांत असत्य अक्षराचें मिश्रण कधातरी येईल काय ? स्वप्नांत नाहीं, जागृतींत नाहीं, थट्टेंत नाहीं, मस्करींत नाहीं. कै. काकासाहेब दीक्षितांनी चित्त हें अर्धे असलेंच पाहिजे, हा जो ठांतोक सिद्धांत ठरविला तो तरी बाबांच्या जोरावर. असो.

व्यवहारांत, संसारांत, व परमार्थांत अर्ध या शब्दास विशेष प्रसंगी कांहीं विशेष किंमत आहे कीं काय तें पाहूं.

आपल्या घरी आलेल्या वंदनीय व पूज्य अतिथीस, पाहुण्यास, मित्रास, नातेवाइकास अथवा इतर सन्माननीय सद्गृहस्थास आपल्या बैठकीपैकीं अर्धी बैठक बसण्यास देणें किंवा त्यास परमादरानें अर्धे बैठकीवर बसविणें म्हणजे त्याचा विशेष गौरव किंवा बहुमान करणें किंबहुना त्यास आपल्याइतकेंच लेखणें असें समजण्यांत येतें. हा व्यवहारांत सर्वांचाच अनुभव आहे. या ठिकाणीं अर्ध याचा अर्थ पूज्य, अत्युच्च वंद्य असा होतो. पूर्वी राजेलोकांत व देवांत ही ही चाल होती.

उदाहरणः—अर्धासनं गोत्रभिदोऽधितष्ठौ, म्हणजे इक्ष्वाकु वंशांतील महाप्रतापी पुरंजय नांवाचा राजा, स्वर्गीय ऐरावतावर बसणारा, पर्वताचे आपल्या वज्रानें पंख छेदन करणारा असा जो सुराधिप इंद्र त्याच्या अर्ध्या आसनावर बसला म्हणजे मृत्युलोकांतील राजा स्वपराक्रमानें इंद्राच्या योग्यतेस चढला, व त्याचें दर्शक म्हणून इंद्रानें त्यास आपल्या आसनापैकी अर्ध्या आसनावर बहुमानानें बसविलें. ( रघुवंश सर्ग ६, श्लो. ७३ ) तसेंच

'मम हि दिवौकसां समक्ष मर्धासनोपवेशितस्य' म्हणजे देवांसमक्ष इंद्राच्या अर्ध्या आसनावर ( इंद्रानें ) बसविलेला मी त्या माझी वगैरे—यांतही आपल्या सर्व देवांसमक्ष इंद्रानें आपल्या अर्ध्या आसनावर बसवून आपला बहुमान केला, असें दुष्यंत राजानें म्हटलें आहे. ( अभिज्ञानशाकुंतल सप्तांक )

परी अर्जुना तुझेनि वेधें । मिया देवपणाची बिरुदें ।
सांडिलीं गा मी हें आधें । सगळेनि तुवा ॥१३७२॥

श्री. ज्ञा. अ. १८, श्लो. ६५

परंतु अर्जुना मला तुझा इतका छंद लागला आहे की मी आपली देवपणाची सर्व चिन्हें फेकून देऊन तुझा भक्त बनलों आहें व तूं मद्रूप झाला आहेस; म्हणून मी अर्धा व तूं सगळा आहेस. आतां हें कृष्ण परमात्म्याचे बोलणें जरी औपचारिक आहे तरी त्यावरून विशिष्ट प्रसंगीं अर्धत्वाची योग्यता अनुपमेय आहे हें दिसून येईल. वरील तीन उदाहरणें व्यवहारांतील झालीं.

आतां संसारांतही—मग तो संसार मनुष्याचा असो वा देवाचा असो—मनुष्याच्या किंवा देवाच्या शरीरांतील अर्धा भाग ( वामांग ) अर्ध हा स्त्रीचें किंवा मूलमायेचें अर्धासन मानलें आहे. आणि म्हणूनच अर्धांगी (वामांगी) अर्धनारीनटेश्वर असे शब्दप्रयोग गीर्वाण व मातृभाषेंत रूढ झाले आहेत. यावरून संसारांतही अर्धासनाची योग्यता बहुमोल आहे.

आतां अर्ध याची योग्यता परमार्थांत कशी आहे तें पाहूं.

विवाह झाला म्हणजे संसारास सुरवात होते, अशी एक खुळी समजूत आहे. पण देह निर्माण झाला, कीं संसार सुरू झाला, ही गोष्ट सत्य आहे. संसार निर्माण झाला, कीं तेथें व्यवहार आलाच. संसार व व्यवहार हे अ उ म या त्रिगुणात्मक ॐकार कक्षेंत ( म्हणजे शब्दब्रह्म कक्षेंत ) येतात, म्हणजे ओंकाराच्या अर्धमात्रेंत येत नाहींत व ही अर्ध मात्रा त्रिगुणातीत आहे. विश्ववंद्य वेदमाउली ( शब्दब्रह्म )हीही त्रिगुणात्मक प्रणव कक्षेंतच येते. त्रिगुणातीत अर्धमात्रेंत येत नाहीं. आणि म्हणूनच

त्रैगुण्यविषया वेदा । निस्त्रैगुण्यो भवार्जुन ।
निर्द्वंद्वो नित्य सत्वस्थो । निर्योगक्षेम आत्मवान् ॥ ४५ ॥
श्री. भ. गी. अ. २

तम, रज व सत्व या तीन गुणांनीं म्हणजे सुखदुःखादि किंवा जन्ममरणादि द्वंद्वांनीं भरलेले वेद आहेत. म्हणून तूं गुणातीत, सुखदुःखादि द्वंद्वांपासून अलिप्त, नित्य, सत्वस्थ ( शुद्धसत्वस्थ ), योगक्षेमादि स्वार्थांत न

गुंतून राहतां, आत्मनिष्ठ हो, असा उपदेश षड्गुणैश्वर्य भगवंतांनी शिष्यराज अर्जुनास केला आहे. यांतील बीज तरी काय आहे ? त्रिगुणांच्या पलीकडे जरी अर्जुन गेला, तरी तो ताबडतोब आत्मरूप होणार का ? नाहीं. तीन गुणांच्या पलीकडील जो नित्यसत्व किंवा शुद्धसत्व गुण, कीं ज्यांत योगक्षेमाची काळजी नाहीं व मी तूं पण किंवा जग, ईश्वर भेद नाहीं, अशा केवल आत्मनिष्ठ चतुर्थ गुणाचा आश्रय कर. कितीही सत्वगुणाधिक्य झालें, तरी त्यापासून संसार-मुक्तता नाहीं, बद्धताच आहे; आतां ही बद्धता लोह, रौप्य शृंखलात्मक नाहीं, सुवर्णात्मक आहे, हें खरें; पण सुवर्णात्मक जरी असली तरी शृंखलाच

तत्र सत्वं निर्मलत्वात् । प्रकाशक मनामयम् ।
सुख संगेन बध्नाति ; ज्ञान संगेन चा नघ ॥ ६ ॥ श्री. भ. गी. अ. १४

साराश, निवळ सत्त्वाधिक्य बुद्धीनें परमात्मप्राप्ति नाहीं. अर्थात् शुद्ध सत्व, नित्य सत्व, सत्वसंशुद्धि हा तीन गुणाच्या पलीकडील परमश्रेष्ठ चवथा गुण आहे, व तो कोठें तरी गुप्तरूपानें वास करीत आहे हें खास. तसेंच हाच चतुर्थ गुप्त शुद्ध सत्व गुण बुद्धि व परमात्मा यां मधील अत्यंत महत्त्वाचा दुवा आहे, हेंही खास.

ॐकार हें परमात्माचें प्रतीक आहे. परमात्मप्रतीकंहितत्—छां. उ. अध्याय १, खंड १, मंत्र ९ वरील आचार्यभाष्य.

ॐकार हें एकाक्षरब्रह्म आहे ( ॐ इत्येकाक्षरं ब्रह्म. श्री. भ गी. अ. ८ श्लो १३) या ॐकार अक्षरांत अ, उ, म व अर्धमात्रा अशा एकंदर ३॥ मात्रा आहेत हें सुप्रसिद्ध आहे.

श्रीमद्दासबोधांत या मात्रांची व तम, रज, सत्व, व शुद्धसत्व या चार गुणांची उत्तम रीतीनें सांगड घालून दाखविली. आहे.

श्रीसमर्थ सद्गुरु रामदास लिहितात.

तत्वामध्यें मुख्य तत्व । तें जाणावें शुद्ध सत्व ।
अर्धमात्रा महत्तत्व । मूळ माया ॥ ११ ॥

श्री. दा. बो., द. १२, स. ५

अकार, उकार, मकार । अर्ध मात्रा तो ईश्वर ॥
ऐशा मात्रा चत्वार । चौं देहाच्या ॥ ४ ॥
तमोगुण, रजोगुण । सत्वगुण, शुद्धसत्व गुण ।
ऐसे हे चत्वार गुण । चौं देहाचे ॥ ५ ॥

श्री. दा. बो., द. १७, स. ९

गुप्त त्रिगुणांचें गूढत्व । म्हणोन संकेत महत्तत्व ।
गुप्त रूपें शुद्धसत्व । तेथें चि वसें ॥ २३ ॥

श्री. दा. बो , द. २० स. २

वरील ओंव्या अत्यंत महत्त्वाच्या, समर्पक व बाबांच्या अर्धा रुपयाचा उलगडा करणाऱ्या आहेत. या ओंव्यावरून ॐकारातील अर्धमात्रा म्हणजेच नित्य सत्व, शुद्धसत्व, सत्वसंशुद्धि, महत्त्वत्व, मूळ माया व गुप्त त्रिगुणांचें गूढत्व या शुद्ध सत्वाची ( शुद्धतत्वाची ) वस्ती म्हणजे चौथे गुणाची वस्ती गूढ अशा महत्तत्वांत म्हणजे अर्ध मात्रेंत आहे. असें सिद्ध होतें.

आतां अंतःकरणच तुष्टयांत अहंकार, मन, बुद्धि व चित्त हीं जीं चार तत्वें आहेत तीं ॐकारांतील साडेतीन मात्रेंत कशीं बसतात तें पाहूं.

भगवान् श्री ज्ञानेश्वर महाराजांनी ही आपले गाथ्यांतील हरिपाठाचे अभंगापैकीं ८६८ वे अभंगांत, वरील दासबोधातील ओंव्यांत लिहिल्याप्रमाणें चार गुणाचेंच वर्णन केलें आहे. म्हणजे शुद्धसत्व हा चवथा गुण धरला आहे

सत्व, रज, तम, शुद्ध-सत्व चौथा । निर्गुणी गुणापरता बाईयानो ।

( श्री विष्णुबोवा जोग प्रकाशित श्री ज्ञा. गा. )

वरील चार गुणास अनुसरून श्री समर्थ ज्ञानेशांनी श्री ज्ञानेश्वरीत अंतःकरणचतुष्ट यांतील अहंकार, मन, बुद्धि व चित्त या चार तत्वांचें खालीं

लिहिल्याप्रमाणे आपल्या नेहमीच्या अमोघ व जिवंत वाणीनें फार सुरस वर्णन केले आहे.

किंबहुना काष्ठीं । **वन्हि** जेविं कीरिटी ।
तेविं प्रकृतीचिया पोटीं । गोप्य जो असे ॥ ७९ ॥
जैसा **ज्वर** धातुगत । अपथ्याचें मिष पाहत ।
मग जाहलिया, आंत । बाहेरी व्यापी ॥ ८० ॥
तैसी पांचा ही गांठी पडे । जैं देहाकार उघडे ।
तैं नाचवी चहूंकडे । तो **अहंकार** गा ॥ ८१ ॥

---

संकल्पें सृष्टी घडी । सवेंचि विकल्पूनि मोडी ।
मनोरथांच्या उतरडी । उतरी, रची. ॥ ११४ ॥
तें गा कीरिटी **मन** । या बोला नाहीं आन ॥ ११६ ॥
जें इंद्रिया आणि बुद्धी । माझारिलिये संधी ।
रजोगुणाच्या खांदी । तरळत असे ॥ १०४ ॥

---

हें सुख हें दुःख । हें पुण्य हें दोख ।
कां हें मैळ हें चोख । ऐसें जे निवडी ॥ ८६ ॥
जें तेजतत्वांची आदी । जे सत्वगुणाची वृद्धी ।
जें आत्मया जीवाची संधी । वसवीत असे ॥ ८८ ॥
अर्जुना तें गा जाण । **बुद्धी** तूं संपूर्ण ॥ ८९ ॥

श्री. ज्ञा. अ. १३ श्लो. ५

तेंवि सत्स्वरूप रुचलें पणें । बुद्धीचें ऐसें अनन्य होणें ।
तें सत्वशुद्धी म्हणे । केशिहंता ॥ ८० ॥

श्री. ज्ञा. अ. १६ श्लो. १

बुद्धी अनन्य येणें योगें । मजमाजी जैं रिगे ।
तैं चित्त चैत्य त्यागें । मातेचि भजे ॥ ६७ ॥

श्री. ज्ञा. अ. १८ श्लो. ५७–५८

या वरून अहंकार तमोगुण, मन रजोगुण, बुद्धि सत्वगुण व चित्त शुद्ध—सत्वगुण, असें उघड दिसतें. व हें अंतःकरणचतुष्ट्य व गुणचतुष्टय औट—साडेतीन—मातृक ॐ कारांत खाली दर्शविल्याप्रमाणें बसतें.

अहंकार——तमोगुण——अकार
मन——रजोगुण——उकार
बुद्धि——सत्वगुण——मकार
चित्त——शुद्धसत्वगुण——अर्धमात्रा

या वरून ॐकारांत चित्ताला अभ्युच्च अतिपूज्य अशा अर्धमात्रेंत स्थान मिळालें आहे. म्हणजे अर्धनारीनटेश्वराप्रमाणें चित्त हें परमात्माचें अर्धासनभागि झालें. ॐकारास साडेतीन नव्हे पण चार मात्रा आहेत. तीन मात्रेंत सगुणब्रह्म येतें. शिलक राहिलेल्या चतुर्थ मात्रेंत निर्गुण ब्रह्म ( पिंडांत, देहांत ) वास करतें. चतुर्थ मात्रा किंवा अमात्रा हें देहांत परमात्माचें स्थान आहे. चित्त शुद्धसत्व झालें कीं ते परमात्म्याच्या चवथ्या मात्रेंतील अर्धमात्रेंत जाऊन बसतें.

अतएव श्री नाथमहाराजांनीं " कायेन वाचा " या श्लोकांत चित्त याचा स्पष्ट उल्लेख नसतां त्या श्लोकावरील आपल्या भाष्यांत त्याचें जें वर्णन केलें आहे, तें त्याच्या अतिपूज्य अशा अर्धत्वाच्या नात्यानें केल्यामुळें अगदी यथार्थ आहे. व तें अर्धे आहे हें उपरि निर्दिष्ट श्रीमद्दासबोधांतील व श्री मद्ज्ञानेश्वरींतील ओंव्यावरून व श्रीमद्ज्ञानदेवी गाथ्यांतील अभंगावरून पूर्ण-पणें विशद होत आहे.

श्रीसंतविभूषण कविवर्य निरंजन माधव यांनीं श्री ज्ञानेश्वरीवर जो अभि-प्राय प्रगट केला आहे त्यावरूनही चित्ताचें पूज्य अर्धत्व मार्मिकपणें श्लेषरूपानें उत्तम प्रकारें सिद्ध होत आहे.

ज्ञानेशो भगवान् विष्णुः । निवृत्ति भगवान् हरः ।
सोपानो भगवान् ब्रह्मा । मुक्ताख्या ब्रह्मणः कला ॥

श्री ज्ञानेश्वर---विष्णूचा अवतार---सत्वगुण---बुद्धिरूप---मकार.
श्री निवृत्तिनाथ---शंकराचा अवतार---तमोगुण---अहंकाररूप-अकार
श्री सोपानदेव --ब्रह्मदेवाचा अवतार---रजोगुण---मनरूप---उकार
श्री मुक्ताबाई---परमात्मकलावतार---शुद्धसत्वगुण---चित्तरूप---अर्धमात्रा

श्री निरंजन माधवांनीं वरील रूपक फारच बहारीचें केलें आहे, इतकेंच नव्हे तर वरील चार भावंडें हीं अनर्घ्य शोभिवंत तेजस्वी रत्नें साडेतीन मातृक, चतुरगुणात्मक, अंतःकरणचतुष्टयात्मक ॐकाररूपीं शंभरनंबरी बावनकसीं परमात्म प्रतीक एकाक्षरब्रम्ह शुद्ध सुवर्ण कोंदणांत अति कुशलतेनें बसवून, त्याचें सुंदर दैदीप्यमान लेणें तयार करून, जगदंबा श्री ज्ञानेश्वरी माउलींचें अखंड वैभवशाली अशा विशाल ललाटावर मध्यस्थानीं चमकत व लटकत ठेविलें आहे.

त्रैलोक्य-भारवाहक गंधवती श्री पृथ्वीदेवीनें आपल्या प्रियपतीस प्रश्न केल्यावरून त्रिभुवन-पालक सत्यमूर्ति श्री महाविष्णूंनीं श्रीमद्भगवद्गीतेची अत्यंत थोरवी गाऊन गीतामाईस ॐकारांतील अर्धमात्रेंत स्थान दिलें आहे. श्री महाविणु म्हणतात.

गीता मे परमा विद्या । ब्रह्मरूपा न संशयः ।
अर्धमात्राऽक्षरा नित्या । स्वानिर्वाच्या पदात्मिका ॥ ८ ॥

वराहपुराण, गीता महात्म्य.

अर्थः---गीता ही सर्व विद्येंत श्रेष्ठ विद्या असून निःसंशय ती ब्रह्मरूपच आहे. ती ॐकारातील अर्धमात्रा आहे. ती अविनाशी आहे. नित्य आहे. परमात्माचें अनिर्वचनीय पद तेच तिचा आत्मा आहे. यावरून अर्घ्याची योग्यता केव्हढी आहे हे लक्षांत येईल.

असो. यावरून शुद्धसत्वात्मक चित्ताची भूमिका अर्धमात्रेंत आहे किंवा त्रिगुणातीत अशी जी सतरावी जीवनकळा त्या सतरावीच्या अर्धासनावर आहे.

बुद्धी कितीही सत्वमय झाली तरी ती परमात्मदर्शन किंवा ब्रह्मसाक्षात्कार करून देण्यास असमर्थ असते. तें काम चित्ताचें असतें. पण त्यांतील विक्षेपादि अंतरायांचा नाश व्हावा लागतो. व तो नाश झाला म्हणजे चित्त नि ल अशा गुप्त शुद्ध-सत्वगुणाचा आश्रय करतें. व अशा चित्तानें केलेलें प्रत्येक कर्म परमात्म्यास अर्पण झालें म्हणजे तें चित्त परमात्मप्राप्ती करून देतें. म्हणजे स्वतःच परमात्मरूप होतें.

यावरून चित्ताची व त्याच्या अर्धत्वाची भूमिका, योग्यता व किंमत कळून येते.

" कायेन वाचा " या श्लोकाच्या आधारें १६ रुपयांची व वरील संतवचनानुसार अर्धे रुपयाची मिळून एकंदर १६॥. रुपये दक्षिणेची संगती याप्रमाणें लागते.

आतापर्यंतच्या सर्व विवेचनावरून १६॥. रुपये दक्षिणा मागण्यांत, व अर्धा रुपया विसरूं नको तो मला पाहिजे असें बजाऊन सांगण्यांत बाबांची अगाध व्यापकता, गहन थोरवी, कल्पनातीत सर्वज्ञता व गूढ तत्वज्ञान दिसून येतें. व त्या बरोबरच कै. भक्तशिरोमणि बाळासाहेब भाटे यांच्या कडकडीत वैराग्याच्या भूमिकेची व बाबांच्यावरील त्यांच्या अलोट, अढळ व निस्सीम श्रद्धेची मजल कोठपर्यंत गेली होती हेंही दिसून येतें. अशा त्या षड्गुणैश्वर्य मूर्तिमंत परब्रह्म बाबांच्या अलौकिक अनुपमेय, अद्वितीय, अतर्क्य, अगम्य. गुणैश्वर्याबद्दल काय वर्णन करूं ! काय कौतुक करूं ! ! किती थोरवी गाऊं ! ! ! जितकें वर्णन करीन, जितकें कुतूहल करीन व जितकी थोरवी गाईन तितकी थोडीच. भगवान श्री ज्ञानेश्वर माऊली म्हणतात त्याप्रमाणें सांईपरमात्माचें गुणवर्णन किंवा कौतूहल वैखरीनें न करतां, त्यांना मूकभावानें शरण जाऊन मौनानें करावें तेंच भलें. शब्दानें कौतुक करण्यांत शब्द लटके पडतात, लुळे पडतात, लंगडे होतात, पांगळे होतात, अंधळे होतात, बहिरे होतात, मुके होतात. सांइब्रम्हाचें वर्णन करतां करतां वेदांचा कंठ शुष्क

झाला. चतुर्मुख पितामह ब्रम्हदेवाची चारीमुखें शिणलीं, शेषाच्या सहस्र रसना थकल्या तेथें य:कश्चित् मर्त्य जंतूची कथा काय ?

बाळासाहेब भाटे खरे भाग्यवान, खरे वैराग्यशील, खरे ज्ञानी. त्यांच्या मिषानें, त्यांच्याजवळ साडेसोळा रुपये दक्षिणा मागण्याच्या रूपानें आपण वर्णाश्रमधर्माप्रमाणें सर्वविहित म्हणजे नित्यनैमित्तिक कर्मे निरहंकारवृत्तीनें निर्हेतुकपणानें, आनंदानें, कर्तव्यबुद्धीनें, फलाशा सोडून बाबांचे पुण्यचरणीं आपल्या १६॥ साडेसोळा द्वारांनीं सतत अर्पण करीत रहावें, ही आपणा सर्वांस केव्हढी तरी अमोल शिकवणूक दयाघन साईमाउलीनें आपल्या परम-श्रेयासाठीं देऊन ठेविली नाहीं कां ! कांहीं केलें व कसें केलें तरी तें मातेचें अंत:करण आहे ! ती कळवळ्याची जात आहे ! ती लाभावीण प्रीती आहे ! तिची योग्यता तिलाच. इतरांना नाहीं.

जितके बाळासाहेब भाटे भाग्यवान विचारश्रीमंत विवेकपूर्ण, वैराग्य-संपन्न व कर्मनिष्ठ, तितकाच मी भाग्यहीन, विचारदरिद्री, विवेकशून्य, वैराग्य-पराङ्मुख, कर्मवैरी, त्यामुळें १६॥ रु. मजजवळ मागितले व लागलीच नको म्हणून सांगून, चार गिनी व पंधराच रुपये दे म्हणून बाबा म्हणाले. असो. बाबांचा हिशोब बाबांनाच माहीत. आपण त्यांच्या दोन दिडक्या ( श्रद्धा व सबूरी ) देत असाव्या. त्यांत अंतर करूं नये. व बाबा म्हणतात त्याप्रमाणें आपण कोणाची बरोबरी करूं नये. पण आपण तरी त्यांना दोन दिडक्या देणार कोण ? दिडक्या त्यांच्याच, दिडक्या तेच, घेणार हीतेच, व मी ही त्यांचाच.

या साडेसोळा रुपये दक्षिणेस मी शीर्षकांत ५२ कसी व १०० नंबरा पलीकडील दक्षिणा असें म्हटलें आहे, त्याचें कारण श्री ज्ञानेश्वर महा-राजांचे वेळीं ५२ कसी व १०० नंबरी सोन्याचा दर कमींत कमी १५ रुपये व जास्तींत जास्त १६ रुपये होता. हें खालीं दिलेल्या ओंव्यावरून दिसून येईल.

तें लोहीचि पधरें सांपडे ॥ ३४ ॥ प्रस्तावना श्री ज्ञा. अ. ६

साडेपंधरा मिसळावें तैं साडे पंधरेंचि होवावें. ॥ ५६७ ॥

श्री ज्ञा. अ. १५ श्लो. १९

कां सुवर्णशुद्धी कस सोळावा जैसा ॥ ९८१ ॥

श्री. ज्ञा. अ. १८ श्लो. ४९

व बाबांनीं साडेसोळा रुपये दक्षिणा मागितली. म्हणजे ५२ कसी व १०० नंबरी सोन्याच्या दरापेक्षां ही उच्चभावाची दक्षिणा मागितली व बाबा ह्मणजे विसावे शतकातील दुसरे ज्ञानेश्वरच. म्हणून या विशिष्ट दक्षिणेस शीर्षकांत मी तसें नांव दिलें आहे. ही दक्षिणा असाधारण, अलौकिक, असामान्य किंवा अपवादात्मक आहे असें मला वाटतें.

शेवटीं ज्यांच्या कृपेनें ह्या चार ओळी लिहिण्याची स्फूर्ती झाली त्या श्रीसमर्थ सद्गुरु साइमाउलीच्या विशुद्ध, विमल, पुण्यपवित्र चरणशतपत्रीं त्रयोविंशति दलरुपीं वाग्राजीव अनन्य भक्तीनें, नितांत प्रेमानें, निर्मल अंतःकरणानें, परम आदरानें व अत्यंत नम्रतेनें समर्पण करून, ह्या बऱ्याच लांबलेल्या चार ओळी संपवून आपली रजा घेतों.

शार्दूलविक्रीडित

चित्ताकर्षक, कांत, गौर न तनू ज्याची, परी लड्ड ही ।
तैसी ना चतुरा गिरा, न रुचिरा, बुद्धी मह्या मड्ड ही ।
नाहीं चित्त भवत्पदीं, रुचि भवीं, मोहें बहू नासला ।
ऐसा ही जरि साइ मो तरि म्हणा हा बाळ कीं आपला ॥

शके १८५५ भाद्रपद
[illegible]. ४ गुरुवार. ठाणें.

संतचरणरज दासानुदास
बाबांचे बाळ.

---

१ आई.

# पत्रव्यवहार

॥ श्रीरघुवीर ॥

श्री. संपादक, श्रीसाईलीला यांस कृ. सा. न. वि. वि.

खालील मजकुरास श्रीसाईलीलेच्या पुढच्या अंकांत (अश्विनच्या) स्थळ देण्याची कृपा करावी, हे विनंति.

नुकताच प्रसिद्ध झालेला श्रीसाईलीलेचा अंक ६, वर्ष १०, भाद्रपद शके १८५५, हा मला वाचण्यास मिळाला. त्यांत पान १३, "अनुभव" या सदराखालीं "बाबांचें बाळ" या सहीनें माझे परमपूज्य तीर्थरूप श्री. तात्यासाहेब नूलकर यांच्यासंबंधीं जो मजकूर प्रसिद्ध झाला आहे, तो बराचसा वस्तुस्थितीस सोडून असल्यामुळें लीलेच्या वाचकांमध्यें ती. तात्यासाहेबांबद्दल अकारण गैरसमज होण्याचा संभव आहे. म्हणून तेवढ्यापुरता त्याचा इनकार करणें त्यांच्या पश्चात् माझें कर्तव्य समजून हें मला लिहावें लागत आहे.

माझ्या परमपूज्य ती. मातुःश्री, ती. तात्यासाहेबांच्या पाठचे आंग्लविद्याविभूषित व वेदान्तव्यासंगी बंधु, दुसरे त्यांचे पदवीधर व गुरुभक्तिपरायण कनिष्ठ बंधु, व तसेंच माझे पदवीधर वडील बंधु, हेही आज आहेत. ती. तात्यासाहेबांच्या अलौकिक निधनप्रसंगीं, माझे वडील बंधु, ती. मातुःश्री, त्यांचे बालमित्र श्री. बाबासाहेब सहस्रबुद्धे व मी समक्ष हजर होतों. वरील माझ्या पूज्य वडील मंडळीस विचारतां लीलेच्या पान १५ वर ती. तात्यासाहेब शिरडीस जाण्यापूर्वी "पक्के नास्तिक" "संतविरोधी" व "पाखंडी" होते, वगैरे जें रसभरित वर्णन आलेलें आहे तें सत्यास धरून नाहीं. ते जरी सुधारक मताचे होते, तरी त्यांचा देवावर पूर्ण विश्वास होता, त्यांची धर्मावर पूर्ण श्रद्धा होती, ते संतविरोधी नव्हते, व पाखंडीही नव्हते.

साधुसंतांबद्दल त्यांचा पूर्ण आदरभाव होता. नाशिक येथें असतांना सिंहस्थांत तेथें येणाऱ्या अनेक साधुसंतांचा परामर्ष घेण्याची त्यांना हौस

घाटे; त्यांपैकीं कित्येकांकडून त्यांनीं योगाची बरीच उपयुक्त माहिती घेतली होती. पुढें पंढरपुरास वाळवंटावर फिरतांना अनेक वारकरी वैष्णवांस त्यांनी घरीं आणून त्यांच्याशीं चर्चा केली होती. त्यांना उपनिषद् ग्रंथ, योगवासिष्ठ व श्रीज्ञानेश्वरी, एकनाथ आदिकरून संतांचें वाङ्मय यांचा मोठा व्यासंग असे. हीं खास संतविरोधीपणाचीं लक्षणें नव्हत. " अभ्यासानें, विवेकानें व स्वतःच्या प्रयत्नानें ज्ञानाची प्राप्ति झाली पाहिजे. त्याला एका गुरूचा मंत्रोपदेश घेतल्यावांचून गत्यंतर नाहीं, असें मात्र नाहीं. " अशी त्या वेळीं त्यांची मनःस्थिति होती. त्यांनीं अनेक सत्पुरुषांचीं आदरभावानें दर्शनें घेतलीं होतीं. पण गुरूपदेश घेतलेला नव्हता, इतकेंच. तसेंच शिर्डीस जाण्याच्या वेळीं त्यांनी ज्या अटी घातल्या असें लेखकाचें म्हणणें आहे, त्यांत विशेषतः " मी बूट-पाटलोण घालून दर्शनास जाणार " ही अट त्यांचा स्वभाव माहीत असलेल्या माणसास तर हास्यापद वाटल्यावांचून राहणार नाहीं. ती. तात्यासाहेबांस रात्रीं दोन वाजतां तंबाखू खाण्याची तलफ आली, वगैरे सर्वथा अविश्वसनीय आहे. त्यांना दिवसांतून ठराविक ३-४ वेळांच तंबाखू खाण्याची संवय असे. " रात्रीं दोन वाजतां तलफ आली, श्रींनीं पोटांत बुक्का मारला " वगैरे कित्येक गोष्टी सत्य नाहींत.

" अनुभव " या विभागाखालीं स्वतः पाहिलेले अनुभव येणें श्रेयस्कर आहे. दुसऱ्यांनीं सांगितलेले तिसऱ्याबद्दलचे अनुभव प्रसिद्ध करतांना असत्यकथनाचा दोष घडणें कसें संभवनीच आहे, तें वरील गोष्टीवरून दिसून येतें. प्रिय वस्तूंच्या ( श्रीसद्गुरूच्या ) स्तुतिप्रसंगीं वाजवीपेक्षां थोडें अधिक वर्णन करण्याचा मोह भक्ताला केव्हां केव्हां आवरत नाहीं, व परिणामीं वस्तुस्थितीचा विपर्यास होतो, असें म्हणावें लागतें. पूज्यपाद श्रीसाई-माउलीच्या सान्निध्यांत ती. तात्यासाहेबांस अनेक अनुभव येऊन त्यांच्या कृपेनें अखेर त्यांस कोणती स्थिति लाभली हें श्रींच्या मुखांतील उद्गारावरून व्यक्त झालेंच आहे.

असो. वरील प्रकरणीं पुनः पुनः पत्रव्यवहार करण्याची माझी इच्छा नाहीं.

वरील लेखास पुढील लीलेच्या अंकांत प्रसिद्धि अवश्य मिळावी. तो अंक व्ही. पी. नें मजकडे पाठवावा; कळावें हे. वि.

महाराजा स्टोअर्स, पुणें नं. ४
ता. १९-९-३३

आपला
**विश्वनाथ लक्ष्मण नूलकर**

---

**॥ श्रीसाईभाउलीप्रसन्न ॥**

५१ ई पालीरोड, खार
ता. २१ सेप्टेंबर १९३३

**श्री. विश्वनाथ लक्ष्मण नुलकर,**

महाराजा स्टोअर्स, पुणें नं. ४,
यांस

कृ. शि. सा. न. वि. वि. आपलें ता. १९ चें कृपापत्र काल सायंकाळीं पोंहचलें, व श्रीसाईलीलेचा आश्विन महिन्याचा अंक पण हातीं आला.

आपल्या पत्राची नक्कल श्री. बाळासाहेब देव, ठाणें, यांजकडे तावड-तोब रवाना केली. सेवक सोमवार तारीख २५ रोजीं रात्रीं शिरडीस जावयास निघावयाचा आहे. तेथें गेल्यावर आपलें स्पष्ट पत्र श्री. देव व माधवराव यांच्या-पुढें ठेवून त्यांचें काय म्हणणें आहे तें व आपलें पत्र हीं दोन्हीं श्री. कार्तिक महिन्याच्या श्रीसाईलीलेच्या अंकांत प्रसिद्ध होतील.

आपला नम्र सेवक
**रा. आ. तर्खड,**
संपादक, श्रीसाईलीला

**श्रीदत्तचित्साई सद्गुरुभ्योनमः**

श्री. साईलीला संपादक महाशय यांस सप्रेम कृ. शि. सा. न. वि.वि.

आपण मजकडे पाठविलेलें श्रीयुत नुलकरांचें पत्र पोंचलें. प्रकृतीच्या अस्वास्थ्यामुळें खुलासा करण्यास विलंब लागला याबद्दल क्षमा असावी.

कै. भक्तवर्य तात्यासाहेब नूलकर यांच्यासंबंधानें लेख लिहून त्यांच्या कुटुंबांतील कोणत्याही मनुष्याची मनोभावना दुखवावी किंवा कांहीं तरी दोष दाखवून लोकांत त्यांच्यासंबंधानें नसता गैरसमज उत्पन्न करावा, असा माझा लेख लिहिते वेळीं हेतु नव्हता व हल्लींही नाहीं. कै. तात्यासाहेब मला त्या वेळींही पूज्य व वंदनीय होते व हल्लींही आहेत.

शिरडी क्षेत्रांत त्यांच्या प्रथमागमनासंबंधानें जें मी लिहिलें आहे, तें मला कै. भक्तश्रेष्ठ नानासाहेब चांदोकरांनीं समक्ष सांगितलेल्या माहितीच्या टिपणावरून लिहिलें आहे; तेथें त्या वेळीं तात्यासाहेबांबरोबर नानासाहेबांखेरीज, त्यांच्या कुटुंबापैकीं अगर त्यांच्या स्नेह्यापैकीं कोणीही नव्हतें. त्यांच्या निधनासंबंधीं हकीकतीचें पत्र नानासाहेबांस शिरडीहून डहाणू तालुक्यांतील ओसरविरा गांवीं आलें. त्या वेळीं मी नानासाहेबांबरोबर होतों. तें पत्र त्यांनीं मला वाचून दाखविलें. मी त्याचें टिपण करून ठेवलें. तात्यासाहेबांच्या प्रथमागमनाची व निधनाची सर्व साद्यंत हकीकत श्री. माधवराव बळवंत देशपांडे यांना माहित असल्यामुळें ती मीं त्यांना ३–४ वेळां विचारली. विड्याच्या पानाची गोष्ट मला माहित नाहीं. बाकीच्या सर्व गोष्टी माझ्यासमक्ष घडल्या आहेत. असें माधवरावांनीं सांगितल्यावर व शिरडींत त्या वेळीं तात्यासाहेबांशीं संबंध असणाऱ्या मंडळीस विचारल्यावर मग मीं हा लेख लिहिला.

चालू वर्षाच्या पुण्यतिथीच्या उत्सवास गेल्या वेळीं मीं माधवरावांस, श्री. नूलकर व श्री सहस्रबुद्धे यांना पत्रें लिहिलीं, व त्यांच्याकडून उत्तर आलें म्हणजे तुम्हास कळवितों असें माधवरावांनीं मला सांगितलें. म्हणून मी त्यांच्या जबाबाची वट पाहत आहें.

कै. तात्यासाहेबांबद्दल कोणतीही हास्यास्पद अथवा अश्लाघ्य गोष्ट लिहून त्यांना कमीपणा आणण्याचा माझा हेतु असता तर "रविबिंब मूळचें निर्मळ, निर्दोष, परंतु आकाशांत एखाद्या वेळीं एखादा चिमुकला ढग त्यावर आला, कीं तें तात्पुरतें तेजोहीन होतें; क्षणार्धांत ढग वितळल्यावर रविबिंब जसें पूर्ववत् चमकूं लागतें, त्याप्रमाणें तात्यासाहेब मूळचे निर्मळ; परंतु जन्मा-

तरांतील किंचित् अदृष्ट-दोष-कलंकामुळें त्याचें मन साधुसंतांबद्दल कलुषित होऊन साईपरमात्म्याचा त्यांना विसर पडला; परंतु अदृष्ट कलंक नष्ट झाल्या-बरोबर त्यांचें मन बाबांकडे जाण्याकरितां तळमळूं लागलें." हे शब्द मीं लिहिले नसते.

आंग्लविद्येचें शिक्षण मिळालेला प्रत्येक मनुष्य प्राय: प्रथम साधुसंतां-बद्दल नास्तिकच असतो, व तसें असणें हेंच उचित. चमत्कृतिनें त्याचा संतांवर विश्वास बसूं लागतो, दर्शनानें दृढ होतो, व अनुभवानें बद्धमूल होतो. तो अंधश्रद्ध राहत नाहीं. तो भाग्यवान होतो. अशीच स्थिति तात्यासाहेबांची होती इतकेंच मला माझ्या माहितीप्रमाणें दाखवावयाचें होतें, व तसेंच मीं लिहिलें आहे.

असो. वरप्रमाणें मी प्रांजळपणें खुलासा केला आहे. दुर्दैवानें नाना-साहेब हयात नाहींत. पण सुदैवानें माधवराव देशपांडे हयात आहेत, त्यांना विचारून किंवा त्यांचें पत्र त्यांना मिळालें असल्यास कृपेनें नूलकरांनीं आपली खात्री करून घ्यावी. इतक्याहीउपर माधवरावांवर त्यांचा विश्वास नसल्यास व श्री. नूलकर यांच्या कुटुंबांतील कोणत्याही मनुष्याच्या मनोभावनेस माझ्या लेखामुळें धक्का पोंचत असेल, तर मी दिलगिरी प्रदर्शित करून बाबांच्याच प्रेरणेनें त्या प्रत्येकांस व कै. भाग्यनिधि तात्यासाहेबांस निर्मळ अंत:करणानें आदरानें व प्रेमानें साष्टांग प्रणिपात घालतों.

हा माझा खुलासा, ही माझी दिलगिरी, व हा माझा प्रणिपात आपण नूलकरांकडे पाठवावा व त्यांना व आपल्यास उचित वाटेल तसें करावें, कळावें, लो. अ. ही विनंती.

आपला नम्र सेवक

**बाबांचें बाळ**

॥ श्रीसाईमाउली प्रसन्न ॥

५१ ई पाली रोड, खार

ता. ९ डिसेंबर, १९३३

रा. रा. विश्वनाथ लक्ष्मण नूलकर

महाराजा स्टोअर्स, पुणें ४

कृ. शि. सा. न. वि. वि. इकडील ता. २१–९–३३ च्या पत्रानुसारें श्री बाळासाहेब देव यांजबद्दल आलेल्या पत्राची नक्कल या पत्रासोबत आपणाकडे पाठवीत आहें.

रा. रा. माधवरावजी देशपांडे नवेंबर ता. २४ रोजीं सेवकाला भेटावयास आले होते; त्यांना आपल्या पत्रासंबंधानें प्रत्यक्ष खुलासा विचारतां ते म्हणाले कीं, आपणांस त्यांनीं पत्र पाठविलें होतें, त्याचें आपणांकडून प्रत्युत्तर नाहीं.

सेवकाचा व आपला देखादेखीचा प्रत्यक्ष संबंध घडून आला नाहीं. तथापि आपले परमपूज्य आजोबा कै. कृष्णाजीपंत नूलकर यांचें सेवक व्हान असतांना त्याच्यावर पितृवत् प्रेम होतें, तें तो कधींही कधींही विसरणार नाहीं. त्याचप्रमाणें आपले परम वंदनीय पिताश्री कै. तात्यासाहेब यांची श्रीसाईबाबांच्या चरणीं अलौकिक भक्ति पाहून तिचा ठसा सेवकाच्या मनावर जो बसला आहे तो यावज्जीव कमी होणार नाहीं. या सर्व कारणांमुळें श्री. देव यांच्या लिखाणावरून आपलें मन दुखविलें गेलें असल्यास त्यासंबंधानें सेवकाला द्विगुणित दुःख होत आहे. श्री. देवांचा व सेवकाचा कै. श्री. तात्यासाहेबांसंबंधानें आदर व प्रेम यत्किंचित् कमीं व्हावयाचें नाहीं. आणि त्यांच्या कुटुंबीय बालगोपालांवर सेवकाची प्रेमभावना कांहींही होवो, कधींही काडीमात्र कमी होणार नाहीं, हें आपण कृपा करून लक्षांत ठेवून आपणाला व आपणां सर्वांस सेवकाचे शिरसाष्टांग दंडवत, यासोबत सादर होत आहेत.

श्रीसाईलीलेचा कार्तिक व मार्गशीर्ष महिन्याचा जोड अंक वरील कारणांमुळें प्रसिद्ध होण्यास विलंब झाला आहे. तो सध्या प्रेसमध्यें छापत

आहे. आपलें पत्र व श्री. बाळासाहेबांचा व सेवकाचा खुलासा याप्रमाणें आपल्यापुढें आहे. तो यापुढील अंकांत प्रसिद्ध होणें न होणें आपल्या इच्छेवर आहे. तरी त्याप्रमाणें कृपा करून कळवावें. ही नम्र विनंति.

आपला सेवक

खार, ता. ९-१२-३३ **बाबा**

---

## ॥ श्रीरघुवीर ॥

महाराजा स्टोअर्स
पुणें नं. ४
ता. १६-१२-३३

श्री. रा. बाबासाहेब तर्खड,

संपादक, "साईलीला" ५१ ई पालीरोड, खार, यांसी कृ. साष्टांग नमस्कार वि. वि.

आपलें ता. १० चें पत्र व श्री. देवांच्या पत्राची नकल मिळाली. श्री. माधवराव देशपांडे यांचें पत्र मला आलेलें आहे. परंतु श्री. सहस्रबुद्धे यांस पत्र आलेलें नाहीं. आपणांस मी यापूर्वींच पत्रोत्तर लिहावयास हवें होतें. परंतु इकडील कामकाजाच्या वगैरे अडचणींच्या परिस्थितीमुळें मला फुरसत झाली नाहीं. जोड अंक प्रसिद्ध होण्यास विलंब झाला आहे, हें पाहून वाईट वाटलें. आमच्या सर्व कुटुंबीयांवर आपली प्रेमदृष्टि आहे याबद्दल मला धन्यता वाटत आहे. माझ्याही मनांत आपणांबद्दल, श्रीसमर्थांचे लाडके भक्त श्रीमाधवरावजी व माझा प्रत्यक्ष परिचय नसला तरी श्री. देव यांच्याबद्दल पूर्ण प्रेमादरी वसत आहे. त्यांच्या लिखाणामुळें आमच्यापैकीं कोणाच्या भावना दुखवल्या गेल्या, अशांतला भाग नाहीं, व श्री.देव यांनीं आपल्या पत्रांत दिलगिरी प्रदर्शित करून साष्टांग नमस्कार घालण्यापर्यंत गोष्ट जाण्याचें कांहीं कारण नाहीं, व त्यामुळें मला फार दुःख होत आहे. अस्तु. परमपूज्य तीर्थरूप तात्यासाहेब यांच्यासंबंधीं ठेलोलेखीं अगर वाचेनें चर्चा करीत बसणें मला योग्य वाटत

नसल्यानें मी यापूर्वी कधींही "लीले"मध्यें लिहिण्याचा उपक्रम केला नव्हता. मला स्वत:ला तो फक्त मननाचाच विषय आहे. परंतु श्री. देवांच्या लेखांतील कांहीं मजकूर विपर्यस्त वाटल्यावरून मला लिहिण्यास प्रवृत्त व्हावें लागलें. त्यांनीं जाणूनबुजून त्यांचा कोणताही अनादर करण्याचा प्रयत्न केलेला नाहीं, हें मी जाणतों. ती. तात्यासाहेबांच्या प्रथमभेटीच्या प्रसंगीं आमच्यापैकीं कोणी जरी हजर नसलें, तरी शिरडीस जाण्याच्या पूर्वी त्यांचा मन:स्थिति काय होती, याची आम्हांस पूर्ण जाणीव आहे. कारण त्याबद्दल आमचे विद्याव्यासंगी वडील चुलते यांच्याशीं त्यांचे वादविवाद होत असत. **श्री देवांच्या लेखांतील " नास्तिक संतविरोधी, पाखंडी " वगैरे वर्णनाबद्दल मी स्पष्ट इनकार करीत आहें.** कारण वस्तुस्थिति तशी नव्हती, व श्री. देव यांनी गैरमाहितीनें तसें लिहिलें असावें. त्या वेळीं हजर असलेल्या गृहस्थांस त्यांची पूर्व मन:स्थिति माहीत असणें मुळीच संभवत नाहीं, व **श्री. माधवरावजी यांसही या मुद्याबद्दल कांहीं माहिती नव्हती. असें त्यांनीं आपल्या पत्रांत मला लिहिलें आहे.** अस्तु.

थोडक्यांत—मी प्रसिद्धीसाठीं पाठवलेल्या पत्रांत कोणताही वादग्रस्त मुद्दा आहे असें मला वाटत नाहीं. तसेंच श्री. देव यांना वाईट वाटेल असें, किंवा तत्कालीन कोणाही साईभक्ताचा अनादर होईल असें त्यांत कांहींही नाहीं, व त्यामुळें माझें पत्र **जसें आहे तसें** छापण्यास कोणतीही अडचण नव्हती. आतां जोड अंक जरी प्रसिद्ध झाला, तरी त्याच्या पुढच्या अंकांत माझें पत्र अवश्य प्रसिद्ध व्हावें, अशी माझी आग्रहाची विनंति आहे. त्याबरोबर श्री. देव अथवा आणखी कोणाचीं पत्रें आपणांस प्रसिद्ध करावींशीं वाटल्यास त्यास माझी कांहीं हरकत नाहीं, व या विषयांत मला अधिकोत्तर पत्रव्यवहार करण्याची इच्छा नाहीं. कळावें लो. अ. हे वि.

आपला,

**विश्वनाथ लक्ष्मण नूलकर.**

# अनुभव

कांदिवली ता. ५-१-३४

रा. रा. रामचंद्र आत्माराम तर्खड,

तीर्थस्वरूप बाबासाहेब यांस आनंदराव प. डाळस याचा साष्टांग नमस्कार. मी आपणांकडे श्री. साईबाबांनीं मला खाररोड स्टेशनवर दिलेला लहानसा अनुभव पाठवीत आहें; तो आपणास योग्य वाटल्यास श्रीसाईलीलेंत दाखल करावा.

नोव्हेंबर १९३३ ची गोष्ट. रा. रा. कृष्णराव बि. पंडित हे आफ्रिकेंत नोकरीस आहेत. ते आपल्या कुटुंबातल्या मंडळीसह तेथें राहतात. शिवाय ते आपल्या साईलीलेचे वर्गणीदार असून श्रीशिर्डीसही माझ्याबरोबर एके-वर्षीं आले होते. त्यांनी मजकडे श्रीबाबांस देणगीदाखल एक पांच शिलिं-गांची पोस्टल ऑर्डर पाठविली होती. ती मी माझ्या बँकेंत काम करणाऱ्या नातेवाइकाकडून वटावून श्रीसाईलीलेचे खजिनदार श्री. बाबासाहेब तर्खड यांजकडे संध्याकाळीं ऑफिसमधून घरीं परत जाते वेळीं खाररोडवर उतरून श्री. बाबांसाहेबाकडे रवाना केली. त्यांच्या मुक्कामीं कुटुंबांतील लहानथोरांसह मंडळी व स्वत: बाबासाहेब स्वभावानें प्रेमळ असल्यामुळें माझा जवळ जवळ एक तास मोडला. मी त्यांचा निरोप घेवून घरीं जाण्यास खार स्टेशनवर आलों. इन्डिकेटरवर रात्री ७॥ वाजतां अंधेरी लोकल गाडी लाविली होती. ती पाहून मला फार वाईट वाटलें, व मला घरीं जाण्यास बरीच रात्र होईल असे नानातऱ्हेचे विकल्प माझ्या मनांत येऊं लागले व दुसरी बोरिवली गाडी ७--४० ला होती. इतक्यांत ७॥ ची अंधेरी लोकलच्या अगोदरची खार स्टेशनवर न थांबणारी गाडी माझ्यासमोर येऊन उभी राहिली, व त्या गाडीचा ड्रायव्हर सांखळ खेंचणाऱ्या पॅसेंजरला शिव्या देत खालीं उतरला, व मी ती फास्ट बोरिवली गाडी श्रीबाबांनीं केवळ माझ्याचकरितां उभी केली कीं काय, असें मनांत म्हणत गाडींत चढलों. इतक्यांत त्याच गाडींत

जोगेश्वरीस राहणारा माझा वाणी स्नेही दिसला, व तो मोठ्यानें ओरडून म्हणाला "अहो रावसाहेब, ही गाडी खार रोडवर थांबत नाहीं; पण ही स्पेशल आपणांसाठीं उभी राहिली आहे." असें तो यहनें म्हणाला, व मीही मोठ्या अभिमानानें त्यास उत्तर दिलें कीं, "मी येथें श्रीबाबांच्या कामाकरिता उतरलों होतों; अर्थात् त्यांनीं आपल्या भक्तासाठीं व त्यांच्या कामगिरीबद्दल कोणी त्यांच्यावर दोष ठेवूं नये, तें प्रत्ययास आणून देण्यासाठींच कीं काय, त्यांनीं ही मला लीला दाखविली." असो. कळावें, लोभ असावा.

आपला नम्र सेवक

**आनंदराव प. डोळस**

## ॥ श्रीराम जय राम जय जय राम ॥

श्रीयुत बाबासाहेब तर्खड यांस सप्रेम नमस्कार. वि. वि.

आपणांस ठाऊक आहेच कीं, चि. सुमन हा रविवार ता. २४ सप्टेंबर १९३३ रोजीं सायंकाळीं ५ वाजतां तापानें आजारी झाला, व त्याच्या आजारीपणांतच मागल्या पुण्यतिथीच्या उत्सवास माझें एकाएकीं ४० मिनिटांत कसें जाणें झालें, व शिर्डीहून ता. २—१०—३३ रोजीं आपण एकत्र परत आल्यावर, सुमनची तबियत काळजीदायक होत जाऊन एकाएकीं ता. १८—१०—३३ रोजीं त्याला डॉ. मुळगांवकरांच्या सर्जिकल नर्सिंग होम, ग्रँटरोडवर दुपारीं २॥ वाजतां स्ट्रेचरवरून ॲम्ब्युलन्सनें न्यावें लागलें, हेंही आपणास विदित आहेच. त्या नर्सिंग होममध्यें ७९ दिवस आम्हीं तिघेजण कोणत्या मानसिक स्थितींत होतों, हेंसुद्धा आपणांस जाहीर आहेच. तरी पण ह्या सुमनाच्या एकंदर दुखण्याच्या अवधींत श्रीसाईमाउलीनें जी काय अगम्य लीला केली आहे, ती मला शब्दीं मुळींच लिहितां येत नाहीं. म्हणून त्या दरम्यान क्षणोक्षणीं इतर घडलेल्या बाबतींचा येथें उल्लेख न करितां फक्त पडलेल्या स्वप्नापैकीं कांहीं आपणांस कळवितों; कारण त्या स्वप्नांतील मर्म साईभक्तांच्या हृदयांत श्रीसाईबाबांच्या अगाध लीलेबद्दल प्रेमाचा उमाळा फुटल्यावांचून राहणार नाहीं.

मंगळवार ता. १०–१०–३३ रोजीं रात्रौ ९ वाजतां चि. साईप्रसाद (उर्फ सुमन ) ह्यास पडलेलें स्वप्न:—

एक साईबाबासारखा फकीर, ज्या खोलींत सुमन आजारी असून बिछान्यास खिळलेला होता, त्या खोलीच्या बाहेर, ओटीवर आला, व सुमनला म्हणाला कीं, मला भाकऱ्या व मेथीची भाजी दे. सुमन म्हणाला, "मी कसा उठूं? मला उठतां येत नाहीं." ते फकीररूपी साईबाबा म्हणाले, "तुझी असली सबब मला नको, मी साईबाबा आहें. माझे आईला बोलाव." तेव्हां सुमनची खात्री झाली कीं हे साईबाबा आहेत. कारण साईबाबा सुमनच्या मातुःश्रीस "आई" अशी हाक मारीत असत. आई इतक्यांत आलीच; व तिनें त्वरित स्वयंपाकघरांतून एका ताटांत ५ भाकरी व दुसऱ्या ताटांत मेथीची भाजी आणली. फकीरानें भाकऱ्या हातांत घेतल्या व "भाजी भाकरीवर टाक" असें म्हणाला. त्याला ती मेथीची भाजी फार आवडली व म्हणाला, "आणखी ही भाजी आण." आईनें आणखी भाजी आणली. त्यानें सर्व खाल्लें व सुमन त्याच्या पायां पडला. नंतर त्यानें खिशांतून पिंजरेची (कुंकवाची) पुडी काढून आईच्या कपाळीं पिंजर लावली, व दुसऱ्या खिशांतून तीन रुपये काढले, त्यांतून दोन रुपये आईस दिले; आई म्हणाली, "तो तिसरा रुपया पण बाबा मला द्या." ते म्हणाले, "तो रुपया आज देत नाहीं, आणखी पंधरा दिवसांनीं देईन." आईनें तो द्याच असा आग्रह केला, तेव्हां बाबा म्हणाले, "बरें, घे जा." व तोही रुपया आईस दिला. आई बाबांच्या पायां पडली. बाबांनीं आपल्या डोकीचा फडका सोडून तो फडका आईच्या डोकीवरून तीन वेळां फिरविला, व बाबा म्हणाले, "कांहीं काळजी करूं नकोस. दिवस कठीण आले. त्यांना तोंड दिलें पाहिजे. पैसा गंज मिळेल. चितू पायीं पडला व बेबी पायीं पडली. इतक्यांत त्यांनीं विचारलें, "परधान कोठें आहे" आई म्हणाली, "ते कोर्टांत आहेत." ते म्हणाले "मी आतां त्याचेचकडे जातों" असें म्हणून निघून गेले. सुमन जागा झाला व लगेच स्वप्न सांगितलें.

हें स्वप्न पडल्यावर १५–२० मिनिटांनीं एकाएकीं डॉ. शामराव नारायण नवलकर ( सुमनच्या वडिलांचे आतेभाऊ ) न बोलवतां आले, व दरवाजा

ठोकला. दादाजी (सुमनचे वडील) बाहेर ओटीवर गेले व डॉ.ला विचारलें "कां आलांत?" ते म्हणाले, "सहज. मला सौ. शांताबाई सुंदरराव नवलकर दादाजींची लहन बहीण संध्याकाळी सांटाक्रुझच्या स्टेशनवर तुझ्या घरून परत जातांना भेटली. तिनें तुझ्या मुलाची हकीकत कळविली, म्हणून सहज आलों." अर्थात् त्यांना आंत नेऊन सुमनला दाखविलें. त्यांनीं तपासलें व म्हणाले, "सर्व ठीक आहे; पण तुम्हीं Glucose ग्लुकोज सुरू करा; त्यानें मुलास ज्यास्त फायदा होईल. Glucose ला तुमचा डॉक्टर बिलकुल हरकत घेणार नाहीं. रात्रीं १० वाजून गेले होते. दुकानें बंद झालीं होतीं. Glucose त्या रात्रीं मिळालें नाहीं. दुसऱ्या दिवसापासून Glucose सुरू केलें व त्यामुळें सुमनला कांहीं आराम वाटूं लागला, व त्या Glucose मुळेंच त्याच्या heart नें पुढें येणाऱ्या तुफानाला दाद दिली नाहीं. हें डॉक्टर शामरावांचें अकालीं येणें ( म्हणजे सुमनच्या स्वप्नानंतर त्वरीत ) व Glucose सुरू होणें, ही अघटित लीला बाबांचीच ! !

---

त्याच रात्रीं म्हणजे ता. १०-१०-३३ रोजी सौ. छोटूबाईस ( सुमनच्या आईस ) पडलेलें स्वप्न:—

सौ. छोटूबाई काळजीग्रस्त बसलेली होती. तिला बाबा म्हणाले, " अग, अशी काय बसतेस? हें तर काय पुढचा ( कार्तिक ) महिना कठीण आहे " पण तें म्हणतांना बाबांनीं " हां, त्यांत काय? " असें म्हणून स्वतःची मान झिटकारली, त्याचा बोध सौ. छोटूबाईस असा झाला कीं तो महिनासुद्धा सुरक्षित निघून जाईल व ती जागी झाली.

हें स्वप्न चि. सुमनच्या त्याच दिवसाच्या स्वप्नास एकंदर जुळतें. ही बाबांची लीला.

---

ता. १८-१०-३३ रोजीं हॉस्पिटलमध्यें गेलों. त्या रात्री सौ. छोटूबाई फार काळजीग्रस्त असतांना पडलेलें स्वप्न:—

हॉस्पिटलमध्यें सुमनकरितां जी खोली घेतली होती, त्या सर्व खोलीभर डाकीवर झाडांच्या फांद्या पानानीं भरलेल्या फिरत होत्या, छोटूबाई

म्हणाली, असें काय होतें ! जे गण वरच्या हवेंत असून त्या फांद्या फिरवीत होते ते म्हणाले, "आम्हीं असेंच करतों." त्याच वेळीं म्हणजे हे गण हवेंत अधर नाचत असतांना, साईबाबा त्यांच्या मधोमध उभे असून, छोटूबाईस म्हणाले, "Operation Successful" व छोटूबाई जागी झाली लगेच वरील स्वप्न सांगितलें. तेव्हां दादाजीनें सुमनला व छोटूबाईला सांगितलें कीं, ह्यापेक्षां जास्त बाबा तुम्हास आश्वासन व धीर देणार तरी किती ! दुसऱ्या दिवशीं सकाळीं ८॥ वाजतां Operation झालें, तें ७९ व्या दिवशीं खरोखर successful झालें, अशी खात्री पटली.

———

हॉस्पिटलमध्यें ता. २२–१०–३३ बुधवार रोजीं दुपारीं ४॥ वाजतां सुमनला पडलेलें स्वप्न:—

सांताक्रुझच्या आमच्या बंगल्याच्या ओटीवरच्या बाबांच्या खोलींत साईबाबा आले. दादाजी खोलींत होते. चितू, बेबी ही पण होती. आई त्याच खोलीच्या शेजारच्या देवखोलींत होती. बाबांनीं ३ रुपये खिशांतून काढले. दादाजींनीं हात पुढें केला. बाबा म्हणाले, "तूं भोळसट आहेस. नोटांनीं तुझे खिसे भरले, कीं तूं हे रुपये कोणास देऊन टाकशील. माझे आयेला बोलाव." अशी आई देवखोलींतून आली. बाबा म्हणाले, "आये, हे घे. आपटून बघ." तिनें ते खरे आहेत असें पाहिलें. पंधरा दिवसांपूर्वीं दिलेले ( म्हणजे सुमनच्या १०–१०–३३ च्या स्वप्नांत ) त्यांत दोन खरे व एक खोटा होता, तो बाबांनीं परत मागून नेला, व पहिले दोन होते ते बाबा म्हणाले, " आये, आतां खर्चून टाक. " आईचे व दादाजीचे डोकीवर बाबांनीं स्वत:च्या डोकीवरचा फडका फिरविला, व म्हणाले, "जा, आतां तुम्हांस कोठली काळजी नाहीं." असें स्वप्न पाहून सुमन जागा झाला. हें स्वप्न पडत असतां सुमन वेड्यासारखा हंसत होता व स्वप्नांत कांहीं बडबडत होता, तें दादाजी, आई सुमनची थोरली मावशी ( तातीबाई ) पाहात होती.

मंगळवार ता. १०–१०–३३ ला रात्रीं ९ वाजतां सांटाक्रुझ येथें पडलेल्या स्वप्नाप्रमाणें आजचा म्हणजे ता. २५–१०–३३ चा बरोबर १५ वा

दिवस. बाबांनी सुमनच्या त्या पहिल्या स्वप्नांत आईच्या आग्रहावरून दिलेला तिसरा रुपया खरा नव्हता; म्हणजे त्या वेळीं सुमनची प्रकृति ठीक नव्हती,व नंतर १५ दिवसांनीं म्हणजे ता २५–१०–३३ रोजीं बाबांनीं तीस रुपये आपटून बघ असें जें सांगितलें त्याचा बोध आतां तुझीं तिन्हीं मुलें दीर्घायुषी आहेत, आतां त्यांची कांहीं काळजी राहिली नाहीं, असा त्या स्वप्नाचा बोध आम्हास झाला, व त्यानंतर सुमनची प्रकृति पुन्हां काळजीदायक होऊन ता. १–१२–३३ला दत्तजयंतीच्या दिवशीं जरी दुसरें ऑपरेशन करावें लागलें व कितीही सुमनची प्रकृति बिघडली, तरी वरील स्वप्नामुळें बाबा त्यास खास बरा करणार, अशी खात्री झाली होती. अशी अगाध लीला बाबांची कोणत्या मुखानें तरी वर्णिली जाईल ?

---

ता. ९-११-३३ रोजीं हॉस्पिटलमध्यें पहाटेस पडलेलें सुमनचें स्वप्नः—

आम्हीं सर्व शिर्डीस गेलों. दादाजी व आई बाबांची पंचामृतपूजा समाधीवर करीत आहेत, व पूजा आटोपून गलेफ चढत होते. तेव्हां सुमन गोमुख ( समाधीचे ) कोरींत होता, तों त्या गोमुखाला भोक पडलें व त्या भोकांतून पाहतो तों आंत साईबाबा बसलेले असून हंसत होते, व त्यांच्या दोन बाजूस मोठ्या समया सर्व वाती उजळलेल्या पाठीच्या बाजूस, लावलेल्या होत्या सुमननें व दोन पुढच्या बाजूस उंच निरांजनें पाहतां क्षणींच आईला हाक मारली. आई म्हणाली, "चल वेड्या. तेथें बाबा कसे दिसतील !" मनोहर ( सुमनचा माऊसभाऊ ) म्हणाला, " मावशीबाई, साईबाबा खरेच दिसतात," व मनोहर "दादाजी तुम्ही पण या " असें म्हणाला. तसेंच आई व दादाजी आले व त्या दोघांनीं बाबांस हंसत असलेले पाहिलें, व दादाजी म्हणाले, "काय वंडर, काय वंडर!" इतक्यांत सुमन जागा झाला.

---

हॉस्पिटलमध्यें बुधवार ता. ६-१२-३३ रोजीं पहाटेस सुमनला पड-लेलें स्वप्न. ह्या तारखेपासून सुमनचा ताप नाहींसा झाला.

सांताक्रूझच्या आमच्या वखारीच्या जागेंत दादाजींनीं बंगला बांधला आहे; त्याची वास्तुशांति आहे. चौघडा, वाजंत्री मंडळीची गर्दी आहे, व सर्व

कार्य मोठ्या उल्हासानें चालू आहे. आईला आलेल्या अहेराच्या लुगड्यांचा ढीगही पाहिला, व सुमन जागा झाला.

ह्या दोन्हीं स्वप्नांतून सुमन बरा होऊन पुढें काय काय होणार, त्याचें दिग्दर्शन बाबांनीं त्याला आधींच सुचविलें आहे.

म्हणून प्रिय बाबासाहेब, मी आपणास जें नेहमीं म्हणतों कीं, साइबाबा-सारखा संत (म्हणजे खरें पूर्ण ब्रह्म) ह्यापूर्वी झालेला निदान मीं तरी ऐकिला नाहीं व ह्यापुढें होईल किंवा नाहीं हेंही खात्रीनें सांगतां येत नाहीं, असेंच पुन्हा म्हणून वरील हकीकत संपवितों.

६-१-३४
कॉर्नर ऑफ साईबाबा लेन व घोडबंदर
सँटाक्रुझ.

आपला
**मोरेश्वर विश्वनाथ प्रधान**

## "श्रीसद्गुरुसाईबाबा"

१९१८ एप्रिल महिन्यांत शुक्रवारीं रात्रौ १२ वाजतां माझा व माझ्या स्नेह्याचा वादविवाद चालला होता व तो मला सांगूं लागला कीं ( श्रीदक्षिणा-मूर्ति स्वामी मुंगे महाराज ) ( हे स्वामी त्या वेळीं मुंबईंत खेतवाडींत कोल्हापूर-महाराजांच्या पनामामहालमध्यें उतरले होते व बरीच मंडळी दर्शनास जात असत व मीही दोनचार वेळ गेलों होतों. ह्या स्वामींचीं समाधि कोल्हापूर संस्थानांत आहे. ) स्वामी २-४ दिवस झाले, फार रागावले आहेत व ते कोणाचें ऐकत नाहींत, व लवकरच आपल्या गावीं कोल्हापुरास जाणार आहेत.ह्या वादा-मुळें मी फार रागावलों व त्याला म्हटलें कीं, मी २-४ वेळां दर्शनास गेलों होतों, व तेथला प्रकार पहिला, तर कांहीं बाजूचे लोक लोभी होते व महा-राजांच्याकरितां ( समाधीच्या देवळाकरितां ) पैसे गोळा करूं लागले, हें कांहीं महाराजांना आवडलें नाहीं व म्हणूनच महाराज मुंबईंत राहूं इच्छित नाहींत, व माझ्या मताप्रमाणें स्वामींचा एकही खरा भक्त नाहीं; नाहीं तर स्वामी केव्हांही रागवले नसते. खऱ्या भक्ताची केव्हांही निराशा होत नाहीं. माझा मित्र पूर्वी १९१० मध्यें पहिल्यांदा शिर्डीस श्रीसमर्थ साईबाबांच्या दर्शनास गेला होता व नंतरही १९१८ पर्यंत माझ्याबरोबर बरेच वेळा आला होता. बाद आटोप-

त्यावर मी घरीं गेलों. परंतु सर्व रात्र ( कांहीं विचार चालले होते ते कांही मला आठवत नाहीं.) जागून काढली व सकाळीं नित्याप्रमाणें ९ वाजतां नोकरीवर गेलों. तरी पण कामाकडे लक्ष लागेना. सुमारें १ वाजतां दोनप्रहरीं असें वाटलें की, आजच्या रात्रीं शिर्डीस निघून जावें व मी त्वरितच कोटांत साईभक्त कै. आत्माराम स्टांपवेन्डर ह्यांना भेटलों व सांगितलें कीं, आज रात्रौ मी शिर्डीस जाणार आहें व एकाएकीं बेत कसा झाला हेंही मीं सर्व सांगितलें व त्यांनीं विचारलें कीं, शनिवार आहे, तेव्हां आपणही चलावें. परंतु त्यानें मजजवळ दक्षिणा दिली व मीं ती बाबांना दिली. जेव्हां कै. आत्मारामनें नाहीं म्हणून सांगितलें तेव्हां मला फार वाईट वाटलें व तसाच विचार करीत दुसऱ्या मित्राला पाहण्यासाठीं रॅली ब्रदर्सच्या ऑफिसांत गेलों. परंतु शनिवार असल्याकारणानें तो घरीं गेला. माझ्या मनांत फार होतें कीं, त्या मित्राला घेऊन जावें; परंतु तो भेटला नाहीं. मनांत विचार आला कीं, ट्रॅममध्यें बसून घरीं जावें. तोही बेत फिरला व आस्ते बोरिबंदरजवळ पाईंच आलों,तों समोर दत्त म्हणून माझा मित्र उभाच ! त्याला ही सर्व रात्रीची हकीकत सांगितली व तोही शिर्डीस येण्यास तयार झाला. हा मित्र भेटल्यानंतर विचार आला कीं, रात्रींचा स्नेही भेटेल तर त्यालाही घेऊन जावें. बाबांची कृपा म्हणून तो गृहस्थ मी स्टेशनवर जात असतां भेटला, व त्यालाही सांगितलें कीं, काल तुझ्याजवळ रात्रीं वाद केला त्याचा परिणाम आहे; तेव्हां तूंही येत असलास तर चल; तोही आमच्याबरोबर शिर्डीस आला. मजा अशी झाली कीं, आम्ही सकाळीं तेथें गेल्यावर नित्याप्रमाणें आरतीही आटपल्यावर खाणावळींत जेवावयास गेलों. जेऊन १ तासानें परत मशिदींत आलों, तों श्रीजवळ डॉ. पिले, फकिरा, वगैरे मंडळी बसली होती व आम्ही आंत जातां फकिरा वगैरेनीं सांगितलें कीं, वाड्यांत जा. हें ऐकून आम्ही तिघेही बाहेर जाऊन उभे राहिलों; ( कारण बाबांनीं समाधि लावली असेल असें मला वाटलें.) २ मिनिटांनीं बाबांनीं मला हाक मारली (रामदास) (कारण, बाबा मला नेहमीं रामदास हाक मारीत असत व तें कां हें आपल्याला पुढल्या वेळीं कळून येईल. ) व म्हणाले कीं, तूं नेहमीं आलास कीं उठून जातोस. वर ये, मला तुझ्याशीं

बोलावयाचें आहे. चारदोन दिवस रहावें. मी व माझे स्नेही वर गेलों तो तरतच डॉ. पिले व फकिरा बाजूस झाले व मला जागा दिली. परत तेच शब्द ! चारदोन दिवस रहावें; असें उठून जाऊं नये. नंतर मीं नमस्कार केला व खांबाच्या बाजूला बसलों. इतक्यांत कोणीं फळें आणलीं. त्या यांपैकीं कांहीं माझ्या मित्रांना बाबांनीं दिलीं; त्या वेळेस मी बाबांना विचारलें कीं, माझा पुतण्या जवळ जवळ ५ वर्षांचा होत आला; आतां जायवळ केव्हां करूं ? श्री म्हणाले कीं, करूं लवकरच. तेव्हां मी म्हटलें कीं, आतां वैशाखांत करावा का ? तेव्हां ते म्हणाले की, करा दहा आठ दिवसांनीं हे शब्द ऐकतांच मला वाईट वाटलें व मनांत म्हटलें कीं, आपण दहा आठ दिवसांनीं सांगतांना मजजवळ पैसे नाहींत व मला मोठ्या डामडौलानें करावयाची आहे व तुम्ही दहा दिवसांनीं म्हणता, त्यांत माझा शुक्रवार वळणार. शुक्रवार माझ्या मनांत येतांच बाबा म्हणाले कीं, "जा, शुक्रवार," तेव्हां मला वाटलें कीं जरी पैसे नाहींत तरी तयारीस लागावें. बाबाच सर्व खर्च करतील व मी बाबांना त्या वेळेस सांगितलें, तुम्हीं म्हणतां त्याप्रमाणें मी करितों व आपण त्या दिवशीं घरीं आलें पाहिजे. बाबा म्हणाले कीं येइन बरें. कांहीं वेळानें बाबांनीं आम्हांला मुंबईस जाण्याची परवानगी दिली व आम्ही मशिदींतून बाबाना वंदन करून बाहेर निघालों तेव्हा माझ्या मित्रानें विचारलें कीं, तूं बाबांना आमंत्रण केलेंस, परंतु दिवस कांहीं सांगितला नाहींस दुसरा म्हणूं लागला कीं शुक्रवार म्हणाले, तेव्हां तोच दिवस असावा. मी म्हटलें कीं शुक्रवार म्हणजे दिवस नाहीं. बाबांनीं सांगितलें कीं, जायवळ करावयाचा, व माझ्या जवळ पैसे नाहींत. मला तर थाटांत करावयाचा. तेव्हां मी मनांत विचार केला कीं, करा ह्यांत काय माझा शुक्रवार वळणार. ह्याचें हें उत्तर आहे. घरीं आल्यावर मी मातुःश्रीला सांगितलें कीं दहाएक दिवसानें पुतणाचा जायवळ करावयाची आहे व सध्या मजजवळ पैसे नाहींत तेव्हां तिनें सांगितलें कीं, पैसे येतील तेव्हां करावी; कारण चैत्रांतच पांचवें वर्ष लागलें आहे. तेव्हां एवढी धांदल करूं नये. त्या वेळेस मी आईला सांगितलें कीं श्रीसाइबाबांचा हुकुम झाला आहे तेव्हां बाबाच सर्व कांही पार पाडतील; मजजवळ पैसे नव्हते,

तरी मीं धीटाईनें सर्व तयारी केली, व माझ्या वडील भावाला पत्र पाठविलें व तो पैसे घेऊन लवकरच येणार होता; परंतु त्यालाही तेथें कांहीं अडचण आली व पैसेही मिळाले नाहीं. जायवळच्या दोन दिवस आधीं सपाटून पाऊस पडला, तरीही त्या दिवशीं जाऊन मी सोईरीमंडळी यांस आमंत्रण केलें (परंतु जवळ पैसे नाहींत व बाबानें सांगितलें होतें कीं जायवळ करायाचीच; तेव्हां प्रत्येक मिनटाला मला साईबाबां आठवण होत होती.) व मनांत म्हटलें कीं, आतां दोन दिवस राहिले, वडील बंधु आला नाहीं, तेव्हां माझी अब्रू जाते कीं काय ? परंतु बाबांच्या कृपेनें बंधु रात्रीं आला व सर्व कांहीं साईकृपेनें पार पडलें. पण मजा ही कीं, माझें काम होईपर्यंत मला श्रींची आठवण सारखी होत होती, व खुद्द जायवळाच्या दिवशीं मी आमच्या सोइरीमंडळींत गुंग झालों व बाबा म्हणाले होते कीं, मी येईन बरें ! हेंही विसरून गेलों व त्यांचा नैवेद्य सुद्धा मी काढावयास विसरलों. ( परंतु गुरुकृपा म्हटली म्हणजे कांहीं और आहे, हे श्रींनीं मला दाखविलें व जो स्नेह्याबरोबर माझा वाद चालू होता त्याला व जो दुसरा एक स्नेही होता त्या सर्वांना आनंद झाला.) सकाळीं ११ वाजतां माझा पुतण्या झोंपेंतून जागा झाला व श्रीअक्कलकोट स्वामी व श्रीसाई-बाबा ह्यांच्या तसवीरींजवळ नमस्कार करून ओरडत सुटला कीं, आई, मामा, अक्कलकोट स्वामी व साईबाबा जेवावयाला आले आहेत, व आचारी त्यांना जेवावयास वाढीत नाहींत. आम्ही सर्व मंडळी पाहुण्याबरोबर हंसत खेळत होतों; इतक्यांत हा प्रकार पाहिल्याबरोबर मी स्वतः घाबरून गेलों व श्रींच्या तसवीरींजवळ जाऊन माफी मागितली, व सर्व हकीकत त्या मंडळींना सांगितली; तेव्हां मंडळी फार अजब झाली, व म्हणूं लागली कीं तूं स्वतः ( मी ) जर झोंपेंतून ओरडला असतास तर आम्ही समजलों असतों कीं सर्व ध्यानीं-मनीं तेंच स्वप्नीं दिसे. परंतु हा कांहीं निराळा प्रकार झाला व त्या लहान मुलाला बाबा दर्शन देऊन गेले व आम्ही सर्व येथें दुर्भागी आहोत काय ! त्यांपैकीं कांहीं मंडळी श्रीसाईबाबांच्या सेवेस लागली आहेत.

**रामदास**

## श्रीसाइबाबा

नव्हेम्बर महिन्याचें शिर्डीवृत्त

नव्हेम्बर महिन्यांत श्रींच्या समाधि-दर्शनाकरितां अहमदनगर, नाशिक, बेलापूर, जळगांव, माळेगांव, बलसाड, सिन्नर, मुंबर, अंधेरी निगाणें, सान्ताक्रुझ गुंटकल वगैरे ठिकाणाहून ३१ संतप्रेमी मंडळी आली होती.

काहीं भक्तांनीं श्रीसमाधीस अभिषेक केला गुंतकलच्या भक्तांनीं श्रीसाई लेंडीबागेंत श्रींस नैवेद्य केला, व ब्राह्मणभोजन घातलें. ह. भ. प. दासगणू महाराजांचे शिष्य तुकारामबुवा यांनीं ता. २३-११-३३ रोजीं श्रीसाइमंदिरांत कीर्तन केलें. शिरडीचे श्रीयुत बापाजी लक्ष्मण कुळकर्णी यांनीं श्रीसाइमंदिरात ता. २७।११।३३ रोजीं कीर्तन केलें. गुंटकलचे श्रीसाईभक्त श्रीयुत आत्माराम लाडोबा आरोळकर यांचे चिरंजीव श्रीयुत शरद आरोळकर यांनीं समाधि-मंदिरांत ता. ३०-११-३३ रोजीं गायन केलें. इरिगेशन डिपार्टमेन्टचे ओव्हरसिअर व साईभक्त यांनीं दर महिन्यास अंधारी रात्रीचे पंधरा दिवस श्रीसमाधिमंदिरासमोर पेट्रोमेक्सचा दिवा लावण्यास सुरवात केली आहे व त्याबद्दल लागणारें ग्यासलेट तेल ते देणार आहेत.

कांहीं भक्तमंडळीचा गैरसमज झालेला दिसतो कीं, शिर्डी येथें श्रीदत्त जयंतीचा उत्सव शिर्डी संस्थान कमिटी साजरा करिते, व म्हणून त्याकरितां कांहीं भक्त वर्गणी पाठवितात. तर सर्व भक्त मंडळीस कळविण्यांत येतें कीं शिर्डी संस्थान कमिटी हा उत्सव करीत नाहीं व त्याकरितां संस्थानचे अधिकारी यांनीं वर्गणीची मागणी केव्हांही केलेली नाहीं. कोणीही हा उत्सवाकरितां वर्गणी किंवा मदत आजपर्यंत मागितली असेल व कोणी भक्तानें त्याकरितां वर्गणी पाठविली असेल तर कृपा करून ऑ. चिटणीस यांजकडे त्याबद्दलची माहिती कळवावी, म्हणजे अशा भक्तांचा त्याबद्दलचा गैरसमज दूर केला जाईल.

शिर्डी संस्थान कमिटीनें खालील चार उत्सव फक्त मंजूर केले आहेत.

**१ श्रीरामनवमी उत्सव**:---श्रीसाईबाबा यांनीं दासगणू महाराजांस करावयास सांगितला आहे.

२ **गुरुपौर्णिमा उत्सवः**—हा उत्सव नागपूरचे श्रीमंत बुटी बंधु ह्यांनीं साजरा करण्याची जबाबदारी घेतली आहे.

३ **गोकुळअष्टमी उत्सवः**—शिर्डी येथील गांवकरी मंडळी हे हा उत्सव साजरा करितात.

४ **श्रीसाई पुण्यतिथि उत्सवः**—हा उत्सव शिर्डी संस्थान कमिटी साजरा करिते.

उत्सव नं. १, २ व ४ हे मोठ्या प्रमाणावर होतात व त्याकरितां भक्त मंडळी वर्गणी पाठवितात. ह्या उत्सवांचा हिशोब व अहवाल त्या त्या उत्सवाचे जबाबदार भक्त श्रीसाईलीलेंत भक्तांच्या माहितीकरितां प्रसिद्ध करितात. ह्या तीन उत्सवांत शिर्डी संस्थानकडे वर्गणी पाठविणारास शिर्डी संस्थानची छापील पावती दिली जाते. त्यांची नोंद श्रीसाई मासिकांत प्रसिद्ध होते. तसेच कोणतीही रक्कम वगैरे शिर्डीसंस्थानकडे कोणा भक्तांकडून जमा झाल्यास त्याबद्दलची छापील पावतीही संस्थानकडून देण्यांत येते; तर ह्यापुढें कोणा भक्तास कोणत्याही निमित्तानें वर्गणी रकम वगैरे श्रीसाइबाबांस अर्पण करावयाची असल्यास त्या शिर्डीसंस्थानचे आ. खजिनदार श्री. रा. आ. तर्खड, '५१ इ. पाली रस्ता, खार मुंबई २१, यांजकडे पाठवावी, म्हणजे त्यांस संस्थानची छापील पावती देण्यांत येऊन ती रक्कम योग्य रीतीनें संस्थानांत जमा होईल.

जिनसा वगैरे आल्या त्यांचा तपशील

१ श्री ताराबाई कामाठीण बेलापुर–एक हिरव्या रंगाचा झुंबर.

२ श्रीयुत बळवंतराव गणेश देशपांडे, सिन्नर–एक चांदीचे बर, वजन ॥। तोळा

साईभुवन,
१४१ प्रिन्सेस स्ट्रीट,
मुंबई ता. २८–१२–१९२३

**सुं. दि. नवलकर,**
ऑ. चिटणीस

॥ श्रीगुरु प्रसन्न ॥

# श्रीजोड साईमहाराज शिर्डी येथील संवत् १९८९, सन १९३३, शके १८५५ आषाढीपौर्णिमेबद्दल उत्सवासंबंधीं खर्च

| जमा | | खर्च | |
|---|---|---|---|
| २४४-१४-० | वर्गणी भक्तमंडळीकडून आलेली बमोजीं यादी रा. तर्खड-मार्फतची अलग असे. | २०६-१५-३ | यामुदवक खर्च एकंदर |
| ८५-९-९ | समर्थांचे पेटींतील उत्पन्न | ४१-९-० | तांदूळ बारीक ८१॥४॥ |
| १०३-५-६ | श्रीमंत पूर्णचंद्र भय्यासाहेब बुटी, संस्थान सिताबर्डी यांचेकडील रक्कम खर्च झालेली | ६-४-० | तांदूळ टोकळ ८१० |
| | | ३-१-६ | डाळ हरभऱ्याची ८५॥ |
| | | १८-१४-६ | गहू (कर्णाक) ८२॥ |
| | | ७-८-० | डाळ तुरीची ८१० |
| | | २-१२-० | रवा लाडूकरितां ८८२० |
| | | २९-३-६ | साखऱ्या पोतें १ |
| ४३३-१३-३ | | १-०-० | खोबरें ८८२ |
| | | ४-८-० | पत्रावळी १००० |
| | | १-४-० | द्रोण १००० |
| | | ०-१३-० | बदाम |
| | | ०-२-६ | किसमीस ।- |
| | | ०-८-० | शेंगदाणे २ |
| | | ०-४-० | वेलदोडे |
| | | ०-१-६ | मोहरी |
| | | ०-३-६ | साबूदाणा |
| | | ०-५-० | आमसूल १ |
| | | ०-२-० | हिंग तोळे २ |
| | | ०-१-० | गोड जीरें |
| | | ०-३-० | भगर |
| | | ०-५-० | सपीठ |
| | | ०-१-० | धणे |
| | | २-८-० | केशर २॥ तोळे |
| | | ०-४-० | हळद |
| | | ६-७-० | गुळ मण ८८३ |

| जमा | खर्च | |
|---|---|---|
| | ५-५-० | तेल जवसाचें |
| | ८-१२-० | सरपण |
| | १०-१२-० | दुध म्हैशीचे |
| | १०-७-३ | शाक भाजी |
| | २-८-० | डबे चहाचे २ |
| | ५०-०-० | तुपाचीं पिंपें ३ |
| | ०-३-० | काथ पांढरा |
| | १-०-० | सुपारी २॥ |
| | ०-६-० | लवंग |
| | ६-११-६ | अंबरटिप चहाचे ३ बा |
| | १-१०-६ | मसाला |
| | २०६-१५-३ | |
| | १९-८-० | धर्मदाय खर्च |
| | १०-०-० | कीर्तनाच्या बिदागीबद्दल |
| | १९-८-० | इनामखर्च गोरगरीबांस |
| | १९-८-० | |
| | ३१-३-३ | पूजेबद्दल खर्च |
| | ३-०-० | फुलांचे हार |
| | ५-१-६ | सामान पुजेचें शिर्डी येथील |
| | ५-१३-० | सामान नागपूरवरून पाठविलें |
| | १-०-० | गुलाबपाणी |
| | ०-१२-० | सुगंधी तेल |
| | २-०-० | अत्तर तोळा अर्धा |
| | ०-१०-० | उदबत्ती पुडे २ |
| | ०-५-० | गुलाब बुका |
| | ०-८-० | उद पावडर |
| | ०-१०-० | कापूर |
| | ५-१३-० | |

| जमा | खर्च | |
|---|---|---|
| | ०-१२-९ | चिल्लर सामान |
| | ०-१-० | कुंकू |
| | ०-५-० | नारळ ५ |
| | ०-१-३ | खारीक |
| | ०-३-० | उदबत्ती |
| | ०-२-६ | लाह्या |
| | ०-१२-९ | |
| | १६-८-० | पासोडी बदामी रंगाची बाबांचे समाधीवर पांघरण्यास |
| | ३१-३-० | |
| | ५-२-९ | प्रसादाबद्दल खर्च |
| | ०-१०-० | सुंठ व खडी |
| | ४-८-९ | साखर |
| | ५-२-९ | |
| | ५४-५-६ | मजूरी खर्च |
| | १५-६-० | सामान तयारीबद्दल |
| | ८-१५-६ | भीकार भोजनाच |
| | ३०-०-० | मजूरी आचारी व स्वयंपाक्याची मजूरी |
| | ५४-५-६ | |
| | ११६-१०-६ | शिवाय खर्च |
| | ८-१२-० | रोषणाई तेल मातीचे मॅटल ६॥ २। |
| | ३-१२-० | घोड्याकडे खर्च |
| | ०-३-६ | साबण वड्या २ |
| | १०-०-० | ब्यांडबाजा |
| | १-०-३ | चिल्लर कांच पायली |
| | २-०-० | भंगी खर्च |
| | ५-१५-६ | पिशव्यांबद्दल कापड |

| जमा | खर्च | |
|---|---|---|
| | ३-३-० | कापड |
| | २-१२-६ | शिलाई |
| | ५-१५-६ | |
| | २८-२-६ | पोस्टेज खर्च |
| | २५-९-६ | पोस्ट स्टॅम्प |
| | ३-०-० | हँडबील |
| | १-१२-० | लेबलें |
| | २-२-० | एनव्हेलोप्स |
| | २४-१-३ | रेल्वे खर्च आचारी यांचा जाण्यायेण्याचा मोटर-टांगा वगैरे |
| | ०-४-० | चेक सोडविसोड-विण्याचें कमिशन |
| | ११६-१०-६ | |
| | ४३३-१३-३ | |

# श्री शके १८५५च्या श्रीसाईबाबांच्या श्रीगुरुपौर्णिमेच्या उत्सवासाठीं आलेल्या वर्गणीची नांववार यादी

| | | | रु. आ. पै. |
|---|---|---|---|
| आजरेकर | श्री. दत्तात्रय लक्ष्मण | पुणे | ५—०—० |
| आंजर्लेकर | ,, का. रा. | ,, | १—०—० |
| आठवले | ,, आर. बी. | राहाते | २—०—० |
| आवटे | ,, त्रिंबक रामचंद्र | देवास | ३—०—० |
| आम्रे | ,, कु. विमल हरिश्चंद्र | मुंबई | १—०—० |
| आरोळकर | ,, आत्माराम लाडोबा | गुंतकवळ | ५—०—० |
| कमिसेरियटवाला | मिसेस मेरवानजी | मुंबई | १—४—० |
| करंदीकर | श्री. श्रीहरि कृष्ण | इटार्सी | १—०—० |
| कर्णिक | ,, बी. व्ही | मुंबई | १—४—० |
| | ,, बळवंत हरी | बांद्रें | २—८—० |
| कामदार | ,, वामन सखाराम | खरगोण | १—०—० |
| | ,, किसन आणि कंपनी | बोरिवली | २—०—० |
| कोठारे | श्री. गणपतराव मोरेश्वर | मुंबई | १—०—० |
| ,, | सौ. चंपुबाई गणपतराव | ,, | १—०—० |
| कोठारी | श्री. जीवनराम बाळकृष्ण | इंदूर | ५—०—० |
| कोरान्ने | ,, माधव गंगाधर | बिलिमोरा | १—४—० |
| कुरतुडकर | ,, रामचंद्र श्रीपाद | मुंबई | १—१०—० |
| केळोकर | ,, शंकर बाळकृष्ण | मुंबई | १—४—० |
| केसरकर | ,, वामन सांबाशेट | बांद्रें | ५—०—० |
| खारकर | ,, श्रीधर नारायण | ठाणें | २—०—० |
| गावण | ,, आत्माराम | ,, | ०—८—० |
| गाळवणकर | ,, यशवंत जनार्दन | बांद्रें | २—०—० |
| गोरक्षकर | सौ. लक्ष्मीबाई नारायण | सांताक्रुझ | १—४—० |
| गोरक्षकर | ,, सुशिलाबाई वसंतराव | ,, | १—४—० |
| गोरक्षकर | कु. ताराबाई नारायण | ,, | १—४—० |
| गोरक्षकर | श्री. सदाशिव वसंतराव | ,, | १—४—० |
| गोरक्षकर | श्रीमती (बाली) वसंतराव | ,, | १—४—० |
| | | | ५२—१४—० |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | रु. आ. पै. |
| | | | ५२—१४—० |
| चव्हाण | श्री. बी. के. | पालघर | ५—०—० |
| जुन्नरकर | ,, यशवंत राजाराम | धरमपूर | २—०—० |
| जोशी | ,, एम्. एम्. | विरार | १—४—० |
| जोशी | ,, मोरेश्वर विष्णु | उंबरगांव | १—०—० |
| ठाकूर | ,, लक्ष्मण दामोदर | बोरिवली | १—४—० |
| डोळस | ,, आनंदराव परशराम | कांदीवली | २—४—० |
| तवारिया | ,, एफ्. पी. | मुंबई | २—८—० |
| ताडिवाला | ,, दोराबजी धनजीशा | ,, | १—४—० |
| ताटे | ,, अनंत तुकाराम | ठाणें | ०—४—० |
| तालचेरकर | सौ. कृष्णाबाई विनायकराव | इंदूर | ५—०—० |
| दळवी | श्री. जनार्दन रामचंद्र | वसई | २—०—० |
| दातार | ,, गोपाळभास्कर | ठाणें | १—०—० |
| दातार | सौ. सुशीलाबाई गोपाळ | ,, | १—०—० |
| दाभोळकर | श्री. गजानन गोविंदराव | बांद्रें | १—०—० |
| दाभोळकर | ,, जी. आर. | अहमदाबाद | २—०—० |
| दिवे | श्री. श्रीकृष्ण गोपीनाथ | मुंबई | ५—०—० |
| देवधर | ,, विनायक अनंत | बडोदें | ५—०—० |
| देशमुख | ,, लक्ष्मण बाळकृष्ण | ठाणें | १—०—० |
| दौलतसिंगसाहेब मेजर | | ग्वाल्हेर | ११—०—० |
| धुरंधर | सौ. नवुबाई शामराव | सांताक्रुझ | १—४—० |
| धुरंधर | कु. सोनाबाई शामराव | ,, | १—४—० |
| नवलकर | ,, बाबलीबाई सुंदरराव | मुंबई | १—४—० |
| नवलकर | श्री. सुंदरराव दिननाथ | ,, | १—४—० |
| नवलकर | सौ. शांताबाई सुंदरराव | ,, | १—४—० |
| नाईक | ,, यशोदाबाई नारायण | सफाला | १—०—० |
| नूलकर | श्री. विश्वनाथ लक्ष्मण | पुणें | २—०—० |
| नूलकर | श्री. मातु:श्री विश्वनाथ | ,, | ५—०—० |
| पंडीत | श्री. भिकाजी नारायण | तुरवाड | ५—०—० |
| परूळकर | ,, एस. जी. | हरदा | २—०—० |
| | | | १२५—१४—० |

| | | | रु. आ. पै. |
|---|---|---|---|
| | | | १२५–१४–० |
| पागनिस | ,, शिवराम शंकर | मुंबई | १–४–० |
| पाटणकर | ,, दत्तात्रय नारायण | बांद्रें | १–४–० |
| पाठक | श्री. सरस्वतीबाई | ठाणे | २–०–० |
| पितळे | श्री. दत्तात्रय आनंदराव | मुंबई | १–४–० |
| पिल्ले | ,, नारायणस्वामी | पुणें | ३–०–० |
| पेंडूरकर | ,, कृष्णराव नारायण | मुंबई | २–८–० |
| पोतदार | ,, घन:शाम शिवराम | ,, | १–०–० |
| पोरे | श्री. नारायण बाळकृष्ण | चेऊल | १–०–० |
| पोरे | श्री. भागीरथीबाई बाळकृष्ण | चेऊल | २–०–० |
| ब्रह्मांडकर | कु. शांताबाई | मुंबई | २–०–० |
| बांदेकर | श्री. केशव बपुशेट | बांद्रें | २–०–० |
| बेंद्रे | ,, के. एफ्. | कर्जत | २–०–० |
| बारकर | सौ. लक्ष्मीबाई | पार्ले | १–४–० |
| भगवान | श्री. जनार्दन शंकर | पंढरपूर | ५–०–० |
| भट | डॉ. छोटालाल भुलाभाई | चिंचणी | ६–४–० |
| भरुचा | श्री. शापुरजी एच. | मुंबई | १–०–० |
| भागले | ,, मेघ:शाम बाळकृष्ण | बांद्रें | २–०–० |
| भागवत | ,, पांडुरंग लक्ष्मण | भुसावळ | २–०–० |
| भांडारे | ,, श्रीधर गणेश | सोलापूर | २–०–० |
| मदन | ,, रामराव दिनानाथ | मुंबई | १–४–० |
| महाजन | ,, महादेव भिकाजी | ,, | १–४–० |
| मंत्री | ,, पांडुरंग जयराम | ,, | २–८–० |
| मंत्री | ,, बाळकृष्ण जयराम | ,, | १–०–० |
| मंत्री | ,, लक्ष्मीबाई दौलतराव | ,, | ५–०–० |
| मानकर | श्री. बाळकृष्ण माधवराव | बांद्रें | ४–०–० |
| मुदलीयार | सरदार एम्. सी. | पुणें | २–०–० |
| मुसळे | ,, कृष्णाजी मोरेश्वर | भोलवड | १–४–० |
| मुरकुटे | ,, छगनलाल कृष्णराव | मुंबई | १–४–० |
| मेस्त्री | ,, हरिश्चंद्र रामजी | अंधेरी | १–०–० |
| | | | १८७–२–० |

| | | | रु. आ. पै. |
|---|---|---|---|
| | | | १८७—२—० |
| मोडक | ,, गोविंद विनायक | कल्याण | १—४—० |
| मोडक | ,, रामचंद्र वामन | पुणें | ५—०—० |
| मोहिले | ,, बाबाजी आनंदराव | पालघर | १—०—० |
| येरोडेकर | सौ. उमाबाई नरहर | ठाणें | १—०—० |
| राणे | डॉ. जी. के. | मुंबई | २—८—० |
| राणे | श्री. एन. बी. | मिरा | २—०—० |
| रुईकर | सौ. उषादेवी महादेव | ठाणें | १—०—० |
| वखारकर | श्री. खंडेराव दिनानाथ | मुंबई | १—०—० |
| वगळ | ,, रामकृष्ण नाना | ,, | २—०—० |
| वालावलकर | सौ. सीताबाई राजाराम | ,, | १—०—० |
| विजयकर | श्री. खंडेराव माधवराव | ,, | ३—०—० |
| विजयकर | ,, गोवर्धन माधवराव | मुंबई | ०—८—० |
| विजयकर | ,, गंगाबाई माधवराव | ,, | ०—८—० |
| वैद्य | श्री. विनायक अप्पाजी | अंधेरी | १—४—० |
| व्यवहारकर | श्री. सरस्वतीबाई गणपतराव | मुंबई | १—०—० |
| शिरोडकर | श्री. सावळाराम आत्माराम | कुर्ले | १—४—० |
| सबनिस | ,, दत्तात्रय मोरेश्वर | पार्ले | २—८—० |
| सवार | ,, नारायण पुंडलीक | बांद्रे | ५—०—० |
| साईदास | ,, | सान्ताक्रुझ | १—४—० |
| सातघरे | ,, चिंतामण रामनाथ | बांद्रे | १—४—० |
| सांबारे | ,, दाजी विठ्ठल | पार्ले | ५—०—० |
| सामंत | ,, वासुदेव दत्तात्रय | ठाणें | १—०—० |
| सामंत | ,, वासुदेव सीताराम | धुरीवाडा | १—४—० |
| सावंत | ,, बाळकृष्ण राघव | बांद्रे | २—०—० |
| सावे | डॉ. केशरीनाथ वासुदेव | मुंबई | १०—०—० |
| सावे | श्री. मोरेश्वर नारायण | ,, | ३—०—० |
| सुगवेकर | ,, गंगाधर मोरेश्वर | कुर्ला | १—४—० |
| | एकंदर रुपये | | २४४—१४—० |

वैदिक शास्त्री ब्राह्मण। म्हणती महाराजालागून। तुम्ही शुचिर्भूत श्रेष्ठवर्ण। त्यांतून श्रौत अग्निहोत्री ॥ ३४ ॥ ऐसें असून शूद्राप्रत। तुम्ही आदरें जोडून हात। आमंत्रणें भोजनाप्रत। उत्सवांत देतां तया ॥ ३५ ॥ लेखितां आमच्यासमान। तुम्ही शूद्राकारण। तेणें आमुचा अपमान। तुम्ही करितां ये ठायीं ॥ ३६ ॥ उष्ट्याचाही अधिकार। नसे शूद्रास साचार। ऐशा हीन जातीवर। तुमचें प्रेम कशास्तव ॥ ३७ ॥ त्यांची न पडावी साउली। ऐसी शास्त्राज्ञा आहे भली। मग शास्त्रहत्या कैसी केली। विद्वान तुम्ही असतां ॥ ३८ ॥ ऐकून ऐसें भाषण। महाराज झाले मनीं खिन्न। म्हणती या द्विजालागून। अभिमानानें ग्रासिलें ॥ ३९ ॥ वेदांचें खरें हृद्गत। यांसी न कळलें यथार्थ। म्हणून हे शूद्राप्रत। नीच लेखाया सिद्ध झाले ॥ ४० ॥ महाराज म्हणती द्विजांसी। तुम्ही पुरुषसूक्तासी। पठण करितां प्रतिदिवशीं। त्याचा अर्थ सांगावा ॥ ४१ ॥ तेथें स्पष्ट वर्णन। चहूं वर्णांचें केलें जाण। विराट स्वरूपापासून। शूद्र भिन्न नसती पैं ॥ ४२ ॥ मुख जयाचें ब्राह्मण। प्रबळ बाहू क्षत्रिय वर्ण। ऊरु असती वैश्य जन। शूद्र हे चरण त्याचे ॥ ४३ ॥ त्यांतून वगळितां शूद्रांसी। पांगळा होईल हृषीकेशी। म्हणून पंगुत्व प्रभूसी। आणूं नका सुजनहो ॥ ४४ ॥ पंगूस वेदोक्त कर्मांसी। न बसवितील ज्ञानराशी। म्हणून शास्त्रबाह्य मार्गासी। मी न इच्छीं आचराया ॥ ४५ ॥ शूद्र जातीचें जनस्थान। पवित्र आहे सर्वांहून। कलीमलनाशक गंगा जाण। तेथून उत्पन्न जाहली ॥ ४६ ॥ रामपद स्थान शूद्राचें। तेंच सेव्य सकला साचें। मुख बाहू उरुचें। कोणी न करी वंदन ॥ ४७ ॥ ऊरु बाहु मुखाचा। पायांनींच वाहिला भार साचा। मग मीं त्या पदाचा। अनादर कैसा करूं ॥ ४८ ॥ पायाचा मिळतां आश्रय। प्राणी होती निर्भय। ऐसें बोलिलें विद्वद्वर्य। कपील व्यासादि महात्म्ये ॥ ४९ ॥ ब्राह्मण बोलती यावरी। मग आह्मांपेक्षां निर्धारीं। शूद्र श्रेष्ठ भूमिवरी। तुम्हीं

ठरविलें सर्वथा ॥ ५० ॥ तें महाराज करिती भाषण । ऊरु बाहु आणि वदन । हे श्रेष्ठ पायांहून । हें जाणेल कोणीही ॥ ५१ ॥ महाल माड्या बुरुज थोर । उभारिल्या पायावर । पाया अवघ्यास आधार । परी न किंमत तयाला ॥ ५२ ॥ किंमत महाल माड्यांची । जगामाजी होय साची । तीच वर्णाश्रमाची । स्थिति जाणा सुज्ञ हो ॥ ५३ ॥ विराटरूप भगवंताचें । तें रूपक राष्ट्रपुरुषाचें । एकधर्मी लोक साचे । धर्मपुरुषाचे अवयवें ॥ ५४ ॥ हें सिद्ध करावया । कोठें लांब नको जाया । निजदेहास पाहूनियां । कल्पना यांची करा हो ॥ ५५ ॥ पहा पायास होतां रोग जाण । तोंडचि करी दीन भाषण । वैद्याकडे जाऊन । मागे औषध पायातें ॥ ५६ ॥ पाय आपण होऊन । कोणास न प्रार्थी जाण । कां कीं त्याचा विश्वास पूर्ण । आहे सर्वथा तोंडावर ॥ ५७ ॥ पायास कंटक रुततां । कर काढिती तत्वतां । ऐसें एकमेकां- करितां । झटायासी सिद्ध असती ॥ ५८ ॥ मुखाचें काम बोलण्याचें । वा हिताहित सांगण्याचें । नांव राखणें देहाचें । आहे काम कराचें हो ॥ ५९ ॥ कर मुखासी श्रम होतां । त्या श्रमाच्या परिहारार्था । ऊरुच कारण सर्वथा । बसल्या मिळे विश्रांती ॥ ६० ॥ देहाचा वाहती भार । पाय बिचारे साचार । याचा विचार तुह्मी चतुर । करा कीं हो ये ठायीं ॥ ६१ ॥ शूद्रास परके लेखूं नका । ते तुमचे अवयव देखा । तेणें वैकुंठनायका । प्रिय व्हाल तुह्मी हो ॥ ६२ ॥ याच न्यायें तयांना । मी देतों आमंत्रणा । माझ्या जगज्जीवना । अवघे आहेत सारखे ॥ ६३ ॥ सज्जन हो जातीमत्सर । रोग आहे दुर्धर । धर्मपुरुषाचें शरीर । हा वाढला ग्रासील कीं ॥ ६४ ॥ याचा कराया नायनाट । एकीच मात्रा चोखट । ती सेविल्या सांपडेल वाट । सुखदशी इहपरलोकीं ॥ ६५ ॥ हेंच भूतदयेचें । तत्त्व आहे जाणा साचें । रक्षण धर्मपुरुषाचें । करणें सर्वथा अवघ्यांनीं ॥ ६६ ॥ आतीमत्सर वाढऊन । धर्मपुरुषा पंगुपण । आणूं नका हो सज्जन । हेंचि माझें सांगणें ॥ ६७ ॥ हें तुम्हा कळवि-

त्यास सत्य। निर्मिलें वेदें पुरुषसूक्त। त्याचा भलताच करून अर्थ। वेड्यासारिखे करूं नका ॥ ६८ ॥ ऐसी ऐकून श्रीधरोक्ती। वैदिक शास्त्री बोलती। ज्ञानांजन हें डोळ्यांप्रती। तुम्हीच आर्जी घातिलें ॥६९॥ अहंकाराचा वृथा वारा। लागला होता आम्हां खरा। तो तुम्ही आज गुरुवरा। निवटिला ज्ञान सांगोनी ॥ ७० ॥ आजपासून मत्सर। आम्ही न करूं साचार। ऐसें बोलोन जयजयकार। करूं लागले अवघे- ॥ ७१ ॥ असो भोजन चहूं वर्णांसी। देती महाराज आदरेंसी। पाहून या तत्कृतीसी। रामचंद्र डोलतसे ॥ ७२ ॥ कंदकुर्तीचे उत्सवाचा। लौकिक आसमंत भागीं साचा। पसरला होता लोकांचा। समुदाय तेथें जमे ॥७३॥ एके दिनीं उत्सवांत। चोर चोरी करण्याप्रत। आले कंदकुर्तीत। तीन प्रहर रात्रीला ॥ ७४ ॥ बंदुकींसी भरून बार। तमंचा तलवारी कट्यार। सशस्त्र होऊन आले चोर। पांचपन्नास ते ठायां ॥ ७५ ॥ गोफणगुंडे कोणा करीं। शखेचे तोबरे पाठीवरी। मशाली पाजळिल्या बहुतांपरी। आले दरवडा घालावया ॥७६॥ऐसें होतें त्यांच्या मनीं। राम न्यावा लुटूनी। लोकांस ठार मारुनी। द्रव्य न्यावें बहुसाल ॥७७॥ आज दागिने रामावर। घातले आहेत म्हणती फार। त्यांची आशा धरून चोर। आले दरवडा घालावया ॥ ७८ ॥ रात्र अंधेरी चोरांस। पाठीराखी वाटते खास। लोक अवघे निद्रा- वश। झाले श्रमानें उत्सवाच्या ॥ ७९ ॥ त्यांनीं वेढिलें मंदिर। राहोनि सभोंवार। एक हांकेचें अंतर। ठेविलें मध्यें श्रोते हो ॥८०॥ येथेंच उभे राहोनी म्हणती। बंदुकीस द्यावी बत्ती। गोफण गुंडे भिरकाविती। लक्षूनियां मंडपास ॥ ८१ ॥ तें काय करी रघुवीर। सीतापती शारंग- धर। घालवून देण्या अवघे चोर। आपण प्रगट जाहला ॥ ८२ ॥ सवें बंधु लक्ष्मण। धनुष्यबाण घेऊन। मंदिराभोंवतीं फिरोन। भीति दाविती चोरांना ॥ ८३ ॥ बोलावून हनुमान। महाबली वायुनंदन। तयासि रघुकुलभूषण। बोलता झाला या रीतीं ॥८४॥ हे अंजनीगर्भ-

संभूता। वज्रदेही वायुसुता। महाबली धीमंता। आज्ञा माझी अव-धारी ॥ ८५ ॥ चोर चोरीचा धरून हेत। आले कंदकुर्तीत। द्रव्या-साठीं प्राणांत। करितील हे जनांचा ॥ ८६ ॥ मी एक सोडितां बाण। जातील अवघे मरून। तें श्रीधरालागून। कळतां दुःख होईल कीं ॥८७॥ श्रीधर माझा महासंत। मम गळ्याचा ताईत। समसमान शत्रुमित्र। संतालागीं वाटती ॥ ८८ ॥ यासाठीं बाहिलें तुसी। पळवी अवघ्या तस्करांसी। मात्र कोणाच्या प्राणासी। घेऊं नको हनुमंता ॥ ८९ ॥ पुच्छाचे तडाखे देऊन। करीं यांस हैराण। तेणेंच होईल संरक्षण। कंदकुर्तीचें ये वेळा ॥ ९० ॥ रामाज्ञा ऐशी होतां। हनुमान निघाला त्वरित। पुच्छाचे तडाखे झाला देता। मारुती अवघ्या तस्करांस ॥ ९१ ॥ तस्कर त्रस्त देखा। गळल्या करींच्या बंदुका। कोणासी न राहिला आवांका। नीट उभे राहण्यासी ॥ ९२ ॥ भडभडां रक्त ओकिती। मेलों मेलों कैक म्हणती। कित्येक धरणीस लोळती। महाबलीच्या मारानें ॥ ९३ ॥ ऐशामधें अवघी रात। गेली झाली प्रभात। लोक मुखमार्जनाप्रत। येऊं लागले गंगेवरी ॥ ९४ ॥ गुप्त झाला ते अवसरीं। सीतापती रावणारी। पुढें कथा कैशापरी। जाहली ती श्रवण करा ॥ ९५ ॥ हें साकल्य वर्तमान। कळलें श्रीधरालागून। महाराज तेथें येऊन। बोलूं लागले चोरांसी ॥ ९६ ॥ काय बापनो तुमची स्थिती। शोचनीय जाहली अती। क्षणैक सोडितां सन्नीती। ऐसीच होते साचार ॥ ९७ ॥ परी तुमचा जन्म धन्य। नयनीं पाहिला रघुनंदन। मठांत चला अवघे जण। उपचार करितों तुम्हांला ॥ ९८ ॥ घरीं नेऊन तस्कर। कातबोळ पाठीवर। कित्येक घालून बाजेवर। महाराज शेकूं लागले ॥ ९९ ॥ पाहून श्रीधराचें वर्तन। चोर झाले लज्जीत जाण। आपुल्या कृत्यें करून। म्हणती आमुचा जन्म व्यर्थ ॥ १०० ॥ ऐशापरी सोपस्कार। केले यांनीं साचार। केवढे उपकार आम्हांवर। झाले पुण्यपुरुषाचे

॥ १०१ ॥ समर्थांनीं दिली पंगत । त्या अवघ्या चोरांप्रत । सन्नितीनें जगांत । वागा म्हणून सांगितलें ॥ १०२ ॥ आस अलंकारांची । अजून असल्या मनीं साची । नाहीं हरकत आमुची । घ्या काढून सर्वही ॥ १०३ ॥ ऐसें ऐकतां भाषण । तस्करांनीं धरिले चरण । बोलते झाले गहिं-वरून । तें ऐका सांगतों ॥ १०४ ॥ केवढे आपण उदार । तुच्छ तुम्हां-पुढें कुबेर । साक्षात राम सीतावर । रक्षण तुमचें करीतसे ॥ १०५ ॥ मारुतीच्या पुच्छाचे । जेव्हां तडाखे बसले साचे । दूध आठवलें माईचें । ते वेळीं आम्हांला ॥ १०६ ॥ तें आम्हांपैकीं कित्येक जण । जाऊं लागले पळून । परी आंधळे होऊन । परत आले माघारीं ॥ १०७ ॥ मार्ग न दिसे पळायाचा । ऐसा हवाला आमुचा ॥ झाला स्वामी तेधवां साचा । काय विपत्ती वर्णावी ॥ १०८ ॥ धनुष्य बाण घेऊन । उभे राम लक्ष्मण । मठाभोंवतीं सुदर्शन । फिरत होतें महाराजा ॥ १०९ ॥ धन्य धन्य तुमची भक्ती । सखा केला रमापती आजपासून आम्ही पुढतीं । वागूं नीतिमार्गानें ॥ ११० ॥ पहा संतांची संगती । क्षणैक घडतां चोरांप्रती । तात्काळ पालटली मती । संत-प्रभाव ऐसा असे ॥ १११ ॥ असो श्रीधरांनीं अवघ्यांला । रामप्रसाद वांटिला । जावयासी निरोप दिधला । उत्सव अवघा झाल्यावर ॥ ११२ ॥ एके दिनीं शिष्यासी । बोलले श्रीधर पुण्यराशी । आज त्वां जाऊन उपवनासी । पुष्पें आणावीं नानाविध ॥ ११३ ॥ आज मशीं आला ज्वर । न जावेल तेथवर । म्हणून ही कामगिरी तुजवर । लादली मी शिष्यवरा ॥ ११४ ॥ ऐसी आज्ञा होतां क्षणीं । शिष्य बोले मधुर वचनीं । असाच बागेंत जाउनी । पुष्पें आणितों गुरुराया ॥ ११५ ॥ विश्वासून त्याचेवर । महाराज गेले गंगेवर । स्नान करून सत्वर । बैसले पूजा करावया ॥ ११६ ॥ इकडे शिष्य जाऊन बागेंत । बैसता झाला हुरडा खात । न राहिलें भान सत्य । तयालागीं फुलांचें ॥ ११७ ॥ पंचामृतपूजा झाली । परी न सुमनें आलीं भलीं । तेणें चित्त-

वृत्ति चिंतावली । महाराजांची तेधवां ॥ ११८ ॥ आज सुमनांवांचून ।
करणें आलें पूजन । धिक्कार असो मजलागून । विश्वास धरिला
पराचा ॥११९॥ सांग न घडे पूजन । एक्या फुलावांचून । जैसें कुंकुम-
तिलकाविण । शोभा व्यर्थ भूषणाची ॥ १२० ॥ जो विश्वासे परावरी ।
तो मूर्ख म्हणावा निर्धारीं । तें पाहून रावणारी । काय करिता जाहला
॥ १२१ ॥ तच्छिष्याचा घेऊन वेष । प्रगट झाला जगन्निवास । फुलें
भरून परडीस । येता झाला ते ठायीं ॥ १२२ ॥ पुन्नाग बकुळ शेवंती ।
चाफा चमेली गुलाब निगुती । तीं नंदनवनींचीं निश्चितीं । सुमनें बहु
सुवासयुक्त ॥ १२३ ॥ पाहून त्या सुमनांतें । महाराज झाले बोलते ।
ह्या आजींच्या फुलांतें । वास आहे बहुसाल ॥ १२४ ॥ हीं त्वां
आणिलीं कोठून । सांग सत्वर मजलागून । तें ऐकून जगज्जीवन ।
बोलता झाला तें ऐका ॥१२५॥ हीं ताजीं आहेत म्हणून । येतो यांसी
सुवास छान । रोजच्याच ठिकाणाहून । मीं आणिलीं महाराजा
॥ १२६ ॥ असो घेऊन त्या फुलांसी । महाराज वाहती रामासी । सांग
करून पूजेसी । भागवत वाचूं लागले ॥१२७॥ तों इतक्यांत आला तेथ ।
फुलें घेऊन हातांत । निजगुरूस दंडवत । करिता झाला शिष्य-
खरा ॥ १२८ ॥ म्हणे अपराध क्षमा करा । मजलागीं गुरुवरा। पडला
फुलांचा विसर खरा । मशीं हुरड्याच्या नादानें ॥१२९॥ ऐसी ऐकून
शिष्योक्ति । महाराज सांशक झाले चित्तीं । मघा फुलें मजप्रती ।
दिलीस ना त्वां आणून ॥१३०॥ तेणेंच म्यां केलें पूजन । यथासांग वत्सा
जाण । मग हें असंबद्ध भाषण । कां करितोसी कळेना ॥१३१॥ शिष्य
म्हणे सद्गुरुसी । मी न फुलें मघांशीं । आणून दिलीं तुम्हांसी । शपथ
तुमची गुरुराया ॥१३२॥ ऐसें ऐकून तद्भाषण । मनोमय जाणिली खूण ।
शिष्य नव्हता तो नारायण । आला फुलें घेऊन ॥ १३३ ॥ तात्काळ
उठोनी घातली मिठी । श्रीधरांनीं रामकंठीं । हे सच्चिदानंदा जग-
जेठी । कां रे कष्ट घेतले त्वां ॥१३४॥ धिक्कार माझ्या वर्तनास । मज-

साठीं तुज त्रास । होतो देवा बहुवस । उपकार कोठें फेडूं हे ॥१३५॥ तैं समर्थांचें समाधान । करिता झाला रघुनंदन । देव निज भक्तांलागून । न विसंबे कदाही ॥ १३६ ॥ ऐशा अनंत करुन लीला । भाद्रपद शुद्ध प्रतिपदेला । श्रीधरपंतांनीं देह ठेविला । कंदकुर्ती ग्रामांत ॥ १३७ ॥ तात्या महाराज मागुनी । गादीवरी बसले आणी । रामसेवा करूनी । सांप्रदाय चालविला ॥ १३८ ॥ शेष राम बापू नंतर । त्यांचेमागून श्रीधर । अनुक्रमें गादीवर । पुरुण बसले तयांच्या ॥ १३९ ॥ हे महासंता श्रीधरा । शांतमूर्ति उदारा । विसरें न या तुझ्या पोरा । लेंकरूं मीं तुझें असें ॥ १४० ॥ या श्रीधरचरित्रासी । जे कोणी प्रतिदिवशीं । वाचितील प्रेमेसीं । दरिद्र त्यांचें निवटेल ॥ १४१ ॥ महाराज माझा श्रीधर । कुबेराचाही कुबेर । करो करुणेची पाखर । या दासगणूवरी ॥१४२॥ स्वतिश्रीसंतकथामृत । कांचनाचें कोंदण सत्य । श्रीधरचरित्र त्यांत । हिरा वैसवा दासगणू ॥ १४३ ॥ श्रीहरिहरार्पणमस्तु । शुभंभवतु ।

॥ इति द्वाविंशोऽध्यायः समाप्तः ॥

# अध्याय २३

श्रीगणेशायनमः ॥ हे बुद्धिदात्या गजानना । हे सिंदुरासुरमर्दना । हे हैमवतीनंदना । साह्य व्हावें मजप्रती ॥ १ ॥ मागें भक्तलीलामृतीं । म्यां वर्णिले हे सन्मती । दहा अकरांत निश्चितीं । सखारामहाराज ॥ २ ॥ तेथें साकल्य वर्णन । यांचें मी केलें म्हणून । पुन्हां त्याच कथेचें उच्चारण । मी न करीं ये ठायां ॥ ३ ॥ यांचा निवास अंमळनेरीं । खानदेश जिल्हा माझारीं । पंढरीची असे वारी । प्रतिवर्षीं । महाराजा ॥ ४ ॥ महाराज महाभगवद्भक्त । पूर्ण साक्षात्कारी सत्य । रुक्मिणीपती पंढरीनाथ । बंदा गुलाम जयांचा ॥ ५ ॥ एके वेळीं पंढरीसी । यावया निघाला पुण्यराशी । मार्गांत चाळिसगांवासी । मुक्काम झाला तयांचा ॥ ६ ॥ तेथें एक सावकार । श्रीमंत महा उदार । त्याचे गृहीं सुंदर । मूर्ति असे लालजीची ॥ ७ ॥ पंचधातुची सुलक्षणा । ती मूर्ती श्रोते जाणा । ती येऊन कीर्तना । नाचूं लागली एके दिनीं ॥ ८ ॥ तो कैसा घडला प्रकार । तें ऐका साचार । करून मन एकाग्र । अवधान द्यावें कथेतें ॥ ९ ॥ समर्थांची चाळीसगांवीं । कीर्तनें ठायीं ठायीं व्हावीं । श्रोते मंडळी जमावी । बहुत कीर्तन ऐकावया ॥ १० ॥ महाराजांचें कीर्तन । केवळ भक्तिमार्ग निरूपण । श्रोते होती तल्लीन । कीर्तनामृत प्राशितां ॥ ११ ॥ याचें नांव हरिदास । लोभ न स्पर्शे जयास । अंतर्बाह्य जगन्निवास । विश्वपती दिसतसे ॥ १२ ॥ हल्लीं झाले कथेकरी । कवडी शेर घरोघरीं ॥ जो उठे तो गादीवरी । राहे उभा नारदाच्या ॥ १३ ॥ सुभाषितांचा भडिमार । ताणा मारून वरच्यावर । श्रोतयांस करिती गारीगार । दाऊन कथेचा तमाशा ॥ १४ ॥ त्यासी न म्हणावी हरिकथा । तें हरिकथेचें सोंग तत्वतां । तें न प्रिय रमानाथा । होतसे हो कदाकाळीं ॥ १५ ॥ हरिदास असावा भाविक । हरिदास असावा निर्लोभ देख । अध्यात्मज्ञान शाब्दिक त्याचें नसावें सर्वथा ॥ १६ ॥

तैसेंच महाराज सखाराम । सद्भक्तीचें केवळ धाम । ज्याचे कीर्तनीं पुरुषोत्तम । येऊन उभा राहतसे ॥ १७ ॥ जी मुखांतून निघे वाणी । तैसीच असे त्यांची करणी । म्हणून तयांना चक्रपाणी । वश्य जाहला सर्वस्वें ॥ १८ ॥ असो लालजींची रम्य मूर्ति । येऊन नाचे कीर्तनाप्रती । ऐसा बोभाट निश्चितीं । झाला चाळिसगांवांत ॥ १९ ॥ तें ऐकून अभक्त । म्हणती हे गोष्ट असत्य । धातुमूर्ति कीर्तनांत । येऊन कैशी नाचेल ॥ २० ॥ महत्त्व टाळकुटयांचें । जगीं वाढवावया साचें । हें चव्हाट गप्पांचें । वळलें आहे कोणी तरी ॥ २१ ॥ जाऊन पाहूं प्रचित । आज याची कीर्तनांत । मूर्ति धातूची नाचत । पाहूं तेथें कैशा रीतीं ॥ २२ ॥ ऐसा विचार करुनी । आले खळ कीर्तनीं । एकमेकां लागूनी । बोलले ऐसें दुष्ट तें ॥ २३ ॥ पुढें होऊन धरा हात । पुसा कोठें मूर्ति नाचत । गप्पा मारून लोकांप्रत । भजनीं आपल्या लाविसी ॥ २४ ॥ तैं उठला एक तस्कर । ऐसा विचार झाल्यावर । भर कीर्तनामाजीं कर । धरिलासे समर्थाचा ॥ २५ ॥ कोठें दाव लालजींची । मूर्ती नाचते येथ साची । नातरी धिंड काढूं साची । बैसवून तुला गर्दभावर ॥ २६ ॥ ऐकून ऐशा तत्वाला । महाराज विनविती प्रभूला । हे वैकुंठपती घननीळा । दृश्य व्हावें ये ठायीं ॥ २७ ॥ नातरी भक्तिमार्गाचें । नांव बुडेल आज साचें । या भाविक पंडितांचें । करीं देवा समाधान ॥ २८ ॥ धिंड काढोत सुखें माझी । त्याचें न दुःख मज लालजी । परी भक्तिमार्गाची राखवा जी । मायबापा पुरुषोत्तमा ॥ २९ ॥ मग तेथें कोठून उशीर । प्रगट होऊन शारंगधर । करूं लागला सुंदर । नृत्य सर्वां देखता ॥ ३० ॥ तें पाहून अभक्त । झाले असती कुंठित । प्रेमळ भाविक भगवद्भक्त । नमन करिती प्रभूला ॥ ३१ ॥ चाळिसगांवचे धन्य जन । नयनीं पाहिला नारायण । श्रीसखारामालागून । लोक स्तवूं लागले ॥ ३२ ॥ सावकारानें ती मूर्ती । अर्पण केली तयाप्रती । तीच अझून

निश्चितीं । आहे त्यांचे मठांत ॥ ३३ ॥ त्या सखाराम पदासी । नमन माझें अष्टांगेंसी । तो पुण्यश्लोक पुण्यराशी । शुभ करो सर्वदा ॥ ३४ ॥ स्वस्तिश्रीसंतकथामृत । ऐकोत प्रेमळ भाविक भक्त । तरोत अवघे भवाब्धींत । हेंच इच्छी दासगणू ॥ श्रीहरिहरार्पणमस्तु ॥ शुंभभवतु ॥

॥ इति त्रयोविंशोऽध्यायः समाप्तः ॥

# अध्याय २४

श्रीगणेशायनम ॥ जयजयाजी मंगलधामा । मुनिजनांच्या विश्रामा । भक्तजनांच्या कल्पद्रुमा ॥ विघ्नहरा पाव मसीं ॥१॥ असो श्रोते वंदनासी । मी करितों तुम्हांसी । आतां गोविंद चरित्रासी । स्वस्थचित्त परिसेसा ॥ २ ॥ खानदेश जिल्यामाझारीं । गीर्णानदीचे पश्चिम तीरीं । उतराण नामें एक नगरी । वसलीसे कीं मनोहर ॥ ३ ॥ तेथें गुजर जातींत । गोविंद महाराज जन्माप्रत । आले असती निश्चित । तुकोबाचे अवतार जे ॥ ४ ॥ मागें भक्तलीलामृतासी । त्यां वर्णिला हा पुण्यराशी । सतरा अठरा अध्यायसी । चरित्र ह्याचें सांगितलें ॥ ५ ॥ हे पाटील ग्रामाधिकारी । अवघा भर भजनावरी । अहोरात्र श्रीहरी । गाती रसाळ वाणीनें ॥ ६ ॥ असो एके वेळीं फाल्गुनमासीं । कथा अपूर्व धर्तली कैसी । वद्य द्वितीयेचे दिवशीं । खेळगडी मिळाले ॥७॥ ती समवयस्क मंडळी । गोविंद महाराजांची भली । त्यांनीं करून कुटाळी । बेत ऐसा ठरविला ॥८॥ गोविंद पाटील आपुला । मोठा भगवद्भक्त जाहला । धुळवाड ती खेळण्याला । न आला आज आपणांत ॥ ९ ॥ विठ्ठल विठ्ठल नित्य करी । नाचे राउळाभीतरीं । येत पंढरीचा वारकरी । साष्टांग दंडवत घालितसे ॥ १० ॥ करूं त्याची गंमत । आणूं तमाशा पाहण्याप्रत । कोल्हाटीणीचे गळ्यांत । माळ घालूं तुळशीची ॥ ११ ॥ तिजला करूं वारकरी । सगूं गोविंदास ऐशापरी । कीर्तन चावडीभीतरीं । आहे एका भक्तिणीचें ॥१२॥ तुम्ही चला तें ऐकण्यास । ह मानेल तयास । अवघ्या तमासगिरांस । करूं चला हो वारकरी ॥ १३ ॥ आधींच मास फाल्गुन । त्यत धुळवाडीचा दिन । अवघे खेळगडी मिळान । आले वाहण्या समर्थासी ॥ १४ ॥ आज आपुले गांवांत । आले आहेत भगवद्भक्त । कीर्तन त्यांचें चावडींत । ठरविलें आम्हीं ये वे ळ॥ १५ ॥ ते पंढरीचे वारकरी । एक स्त्री कीर्तन करी । म्हणून आपण तेथवरी । चला

कीर्तन ऐकावयास। ऐकून त्यांचें भाषण। महाराजांच हर्षलें मन। डोयीस पागोटें घालून। याया निघाले चावडीसी ॥ १६ ॥ आधींच तमासगिरांप्रत। कथिलें होतें ऐसें सत्य। पाटील येता चावडीप्रत। आव आणा भजनाचा ॥ १७ ॥ ते खालीं बसल्यावर। मग काढा शृंगार। परी तेथें उलट प्रकार। काय घडला तो ऐका ॥ १८ ॥ पाटील येतां चावडीसी। खडी ताजीम दिली त्यासी। वाजवून करटाळ्यांसी। विठ्ठल विठ्ठल म्हणती जन ॥१९॥ सर्व सुखाचें आगर। बाप रखमा देवीवर। हा अभंग तमासगिर। बोलूं लागले ते वेळां ॥ २० ॥ महाराजांनीं कोल्हाटणीसी। नमन केलें अष्टांगेंसी। इतर तमासगिरांसी। वंदिते झाले तैसेंच ॥२१॥ तो दुष्टभाव तयांचा। पालटला कीं शिघ्र साचा। संग लोह-परिसाचा। होता न राहे लोह-पण ॥ २२ ॥ नाचे उडे कोल्हाटीण। मुखें करी नामस्मरण। ती विसरली आपलेपण। भेट होता संताची ॥ २३ ॥ दोन प्रहरपर्यंत। कीर्तन झालें चावडींत। अध्यात्माचे सिद्धांत। कोल्हाटीण बोलली॥२४॥ कीर्तनाची होता आरती। कोल्हाटीण आली देहावरती। आठवली तिसी पूर्ववृत्ति। तेणें झाली शोकाकुल ॥ २५ ॥ पंचामृताचें भोजन। केल्या न रुचे अंबील जाण। कोल्हाटीण आली शरण। सद्गुरुसी तेधवां ॥ २६ ॥ आतापर्यन्त माझी स्थिति। जैशी होती निश्चितीं। तैसीच पुढें गुरुमूर्ति। ठेवा कीं हो सर्वकाळ ॥ २७ ॥ नको नको हें कसबपण। नको तमाशा मजलागून। श्रीहरीचें नामस्मरण। येवो नित्य माझे मुखीं ॥२८॥ नीतिमार्गा नकार। संताजवळी न साचार। कोल्हाटणीस दिधला वर। ठेवून शिरीं वरदपाणी ॥ २९ ॥ धस्ते होशील भगवद्भक्त। चिंता न करीं किंचित। पूर्ण अनुताप होतां सत्य। उपेक्षा न करी पांडुरंग ॥ ३० ॥ तेंच पुढें सत्य झालें। कोल्हा-टणीस उद्धरिलें। संतकृपेचें आगळें। महत्त्व आहे सर्वांहून ॥ ३१ ॥ खेळगडी झाले फजीत। म्हणती एकमेकांप्रत। पाटील आपुले

भगवद्भक्त। कळून आले येवेळां ॥ ३२ ॥ त्या गोविंद पदाला। मी करितों वंदनाला । पिंपळगांवीं ठेविला। देह ज्यांनीं वहुळातीरीं ॥ ३३ ॥ स्वस्तिश्रीसंतकथामृत। सुमनगुच्छ गुंफिला सत्य। गोविंद-चरित पारिजात। त्यांत म्हणे दास गणू ॥ ३४ ॥ श्रीहरिहरार्पण-मस्तु। शुभंभवतु।

॥ चतुर्विंशोध्यायः समाप्तः ॥

# अध्याय २५

श्रीगणेशायनमः ॥ हे जगाच्या आदिकारणा । हे स्थूल सूक्ष्म रूपा दयाघना । परम अचिंत्या पतितपावना । हे सर्वांच्या पाव मसी ॥१॥ श्रेष्ठामाजीं श्रेष्ठतर । प्राणीकोटींत नर शरीर । तैसेंच या भूमीवर । जंबुद्वीप सर्व देशीं ॥२॥ जें अध्यात्मविद्येचें आद्यपीठ । जें संपत्तीचा केवळ घट । जनसमूह चोखट । जेथील सर्व जगत्रयीं ॥ ३ ॥ येथें शंका येइल ऐसी । ईश्वर व्यापक सर्व देशीं । मग याच जंबुद्वीपासी । श्रेष्ठांत श्रेष्ठ म्हणतां कसे ॥४॥ या शंकेचें निरसन । तुम्हीच करा हो श्रोते जन । निज देहास पाहून । नको लांब जावया ॥ ५ ॥ प्राणवायूचें करून । चालतें अवघें शरीर जाण । परी प्राणाचें हृदय स्थान । जैसें सर्व शरीरीं ॥ ६ ॥ तोच न्याय येथींचा । जंबुद्वीप हृदय साचा । ईश्वररुप प्राणाचा । म्हणून म्हणावा श्रेष्ठतर ॥ ७ ॥ तया जंबुद्वीपात । असंख्य देश पाकळ्यावत । मुख्य पाकळी तयात महाराष्ट्र तुम्ही जाणा हो ॥ ८ ॥ सातपुड्याचे दक्षिणेसी । कर्नाटकाचे उत्तरेसी । सह्याद्रीचे पूर्वेसी । तैलंगणा पर्यंत ॥ ९ ॥ जो पसरला आहे मुलुख । नाम त्याचें महाराष्ट्र देख । पूर्व कालीं जेथील लोक । लाजविते झाले जगाला ॥१०॥ ज्या देशांत गोदावरी । वाहती झाली भूमीवरी । जिला आदरें धरी शिरीं । त्रिंबकेश्वर परमात्मा ॥ १२ ॥ जी सकळ तीर्थांची होय जननी । ब्रह्मा विष्णु शूल पाणी । जिच्या तटाकी बैसुनी । त्यागिते झाले स्वस्थाना ॥१३॥ ज्या देशास रामचरण । पूर्वकालीं लागले जाण । पंचवटींत रघुनंदन । शबरीनें गौरविला ॥१४॥ गुणाढ्य हेमाद्रि शालिवाहन । ज्या देशीं जन्मले जाण । ज्यांचें ऐकत नामाभिधान । अवघे माना डोलावती ॥ १५ ॥ मुहूर्त मार्तंड ज्योतिष ग्रंथ । जन्मला याच देशांत । श्रोते टापर गांवात । मान्य जो का विद्वाना ॥ १६॥ मुकुंदराज ज्ञानेश्वर । नाथ रामदास मुक्तेश्वर । नामा तुका चोखामहार । भगवद्भक्त जन्मले ॥ १७॥ मराठीचा कालिदास ।

झाला बारामतीस। ज्याच्या काव्यरसास। सेविता न होय तृप्ती कधीं ॥ १८ ॥ ऐसा महात्मा मयूरपंत। सातारप्रांतीं पंडित ॥ १ ॥ जोशींबुवानीं केली मात। सोलापुरांत राहोनी ॥ १९ ॥ मालक अहंमदशहा बहिरी। होऊन गेला सीनातीरी। शहाशरीफ साक्षात्कारी। जेथें झाला अवलियां ॥२०॥ वेरूळग्रामाचा मालोजी। छत्रपती राजा शिवाजी। बाजीपरशराम महादजी। ज्या देशींचीं वीर रत्नें ॥ २१ ॥ मलीकंबर प्रभुणे फडणीस नाना। जे बृहस्पतीसमान चतुर जाणा। ज्यांच्या चातुर्य वर्णना। अझून लोक करितात ॥२२॥ ऐशा पवित्र देशांत। महाराज आले जन्माप्रत। ग्राम ऊंबरखेडांत। चिन्मयानन्द म्हणती जया ॥ २३ ॥ जो आत्मज्ञानाचा सागर। सद्भक्तीचें माहेरघर। विनयाचें केवळ आगर। मेरु चतुरपणाचा ॥ २४ ॥ त्यांचा घ्यावया उपदेश। मुमुक्षू ऊंबरखेडास येते झाले धरून आस। श्रीहरीच्या दर्शनाची ॥ २५ ॥ अनन्यभावें करून। शिष्य झाले पदीं लीन। केले दीन भाषण। भवसिंधूंत तारा हो ॥ २६ ॥ जन्म दुःखाचें मूळ सत्य। ऐसें बोलले श्रीसमर्थ। दासबोध ग्रंथांत। तेणें अनुताप जाहला ॥२७॥ गुरु कराया भमीवरी। आम्ही हिंडलों आजवरी। कोणी न भेटला। तुह्मांपरी। आम्हांलागीं स्वामीया ॥ २८॥ कोणी आहेत। विद्वान। शब्दार्थ दृष्टीं परिपूर्ण। परी अंगीं वसे अभिमान। तेणें त्याज्य सर्वथा ॥ २९ ॥ कोणीं वाढविला जटाभार। परी कोपयुक्त अंतर। भांग भुरका पंग्यावर। लाविताती समाधी ॥ ३० ॥ परी त्यांच्या त्या समाधींत। स्वात्मसुखाचा न लेश सत्य। प्रतिष्ठा मिळण्या जगांत। केवळ ढोंग माजविती। ३१॥ कोणी राजयोगी म्हणविती। उपाधींस आमंत्रण देती। जीवित आशेच्या करीं अर्पिती। मिरविती डौल रिकामा ॥ ३२ ॥ निजप्रतिष्ठा वाढविण्यास। कोणी निंदिती परास। कोणी घेऊन साधुवेष। जगालागीं ठकविती ॥ ३३ ॥ कोणी होऊन धारकरी। पाठ करिती ज्ञानेश्वरी। दिंडी पताका घेऊन करीं। खेपा

करिती पंढरीच्या ॥ ३४ ॥ परि रहस्य ज्ञानेश्वरीचें । एकासही न कळे साचें । उलट कोश दोषाचे । ते बनती सर्वथा ॥ ३५ ॥ कोणी होऊन रामदासी ॥ वाचिती दासबोधासी । वळेंच श्रीसमर्थासी ॥ प्रवृत्ति मार्गीं ओढितात ॥ ३६ ॥ ऐसें भाषण ऐकतां ॥ चिन्मयानंद म्हणती तत्वतां ॥ येथेंच तुह्मी अवघे चुकतां ॥ वाईट कोणा लेखूं नये ॥ ३७ ॥ सत्यासत्याचा विचार ॥ प्रवृत्तींत न साचार ॥ जग हें मुळींच नश्वर ॥ सत्यासत्य कैचें तेथें ॥ ३८ ॥ असत्य म्हणावें जगाप्रत तरी ब्रह्म तेथें साक्षभूत ॥ जरी म्हणावें तया सत्य ॥ तरी योलिला नाश त्यासी ॥३९॥ जन्मे न कोणी मरे न कोणी ॥ ती भ्रांतीच केवल आणा मनीं ॥ वैकुंठनिवासी चक्रपाणी । पूर्ण ब्रह्म जाणावा ॥ ४० ॥ तो निर्गुण निराकार । सर्वसाक्षी परमेश्वर । तोच व्यापून चराचर । ब्रह्मांडीं या भरलासे ॥ ४१ ॥ मी तूं ही भावना । जी होते आपुल्या मना । ती अविद्या माया जाणा । तितेंच अवघे उकविले ॥४२॥ आपण व्हावें बहुत । ऐसी इच्छा ब्रह्माप्रत । जी झाली तें जगत । निर्माण झालें मुलांनो ॥ ४३॥ एकापासून दोन झाले । दोहोंनीं मग पांच केले । त्या पांचांनीं व्यापिलें । दृश्यादृश्य अवघें ॥ ४४ ॥ तोच वृक्ष पर्वत तोच । सरिता सागर कासार तोच । तेज आकाशपवन तोच । जीव जंतू तोची असे ॥ ४५ ॥ जैसें सुवर्ण असतां एक । दागिने घडविती अनेक । परी तें अनेक । परी तें अनेकत्व बाधक । नच होय सुवर्णा ॥ ४६ ॥ मीच ब्रह्म साक्षात । चित्स्वरूपनाश रहित । ऐसें जो मानील नित्य । तोचि ह्मणावा ब्रह्मवेत्ता ॥ ४७ ॥ हें ब्रह्मज्ञान बाणण्या चांग । ज्ञान भक्ति योग याग । हेंच निर्मिले चार मार्ग । त्यांतें सेवा मुलांनो ॥ ४८ ॥ कर्में करावें निवृत्त मन । योगें करावें इंद्रिय दमन । भक्तीनें करावा आकलन । सगुणरूप परमात्मा ॥ ४९ ॥ सगुण साक्षात्काराविण । खरें न होत ब्रह्मज्ञान । वैराग्य अंगीं पाहिजे पूर्ण । तीनही मार्ग साधावया ॥ ५० ॥

त्या ज्ञानफलद वृक्षाचें। कर्ममार्ग मूळ साचें। योगमार्ग खोड त्याचें। सद्भक्तीही मान फांदी ॥ ५१ ॥ गुरुकृपा हा ऋतु निश्चितीं। फळ येण्या त्या वृक्षाप्रती। तो येतां झोंबती। ज्ञानरूपी फळें तया ॥ ५२ ॥ या त्रयींवांचून जें ज्ञान। तें चार्वाकशास्त्र पूर्ण। जैसें एरंडाचें गुऱ्हाळ जाण। रस ना ऊंस ते ठायीं ॥ ५३ ॥ तुमचा पाहून अधिकार। म्यां हें ज्ञान कथिलें साचार। तुम्हां तिघांस परमेश्वर। भेटेल चिंता करूं नका ॥ ५४ ॥ आतां माझी गुरुदक्षिणा। देऊन जावें स्वस्थाना। ऐसें ऐकतां तिघांना। आनंदी आनंद जाहला ॥ ५५ ॥ गुरुदक्षिणा हेचि द्यावी। आज्ञा माझी ऐकावी। अभेदबुद्धि ठेवावी। तुम्ही तिघांनीं सर्वकाळ ॥ ५६ ॥ कर्ममार्गे करून। रामचंद्रें चालणें जाण। श्रौताग्निहोत्र घेऊन। ज्ञानफला संपादणें ॥ ५७ ॥ अंगिकार योगमार्गाचा। गणेशा त्वां करणें साचा। तेणें ब्रह्मज्ञानाचा। लाभ होईल तुजलागीं ॥ ५८ ॥ भक्तिमार्ग तुकयासी। योग्य आहे निश्चयेंसीं। तेणेंच ब्रह्मपदासी। पावेल तो निश्चयें ॥ ५९ ॥ ऐसें ऐकतां भाषण। अवश्य म्हणती तिघेजण। पदीं घेतलें लोटांगण। प्रत्येकानीं तेधवा ॥ ६० ॥ धन्य आजिचा दीन। ऐकिलें ब्रह्मनिरूपण। सद्गुरुच्या मुखें करून। तेणें कृतार्थ जहालों ॥ ६१ ॥ आज्ञा घेऊन सद्गुरुची। महाराज चिन्मयानंदाची। वाट धरिली स्वगृहाची। त्या तिघांनीं श्रोतेहो ॥ ६२ ॥ अधिकार चिन्मयानंदाचा। किती वर्णूं मी साचा। अवतार ज्ञानेश्वराचा। होते महाराज प्रत्यक्ष ॥ ६३ ॥ उंबरखेडाचें सांनिध्य। यांची समाधी प्रसिद्ध। त्या चिन्मयपदीं शुद्ध। भाव ठेवून नमन करूं ॥ ६४ ॥ स्वस्तिश्रीसंतकथामृत। ज्ञानरूपी गंगा सत्य। पद्यरचना तोय येथ। जाणा म्हणे दास गणू ॥ ६५ ॥ श्रीहरिहरार्पणमस्तु शुभंभवतु ।

॥ इति पंचविंशोऽध्यायः समाप्तः ॥

# अध्याय २६

श्रीगणेशायनमः ॥ हे सिंदुरारे सिंदूरभूषा । गणाध्यक्षा मंगलेशा । वक्रतुंडा मयूरेशा । एकदंता पाव मसी ॥ १ ॥ आतां श्रोते सावधान । ये अध्ययीं निरूपण । बालात्मज चरित्र गहन । सद्भक्तीनें श्रवण करा ॥ २ ॥ गोदेपासून उत्तरेस । ग्राम एक सहा कोस । नाम पेडगांव ज्यास । परभर्णाचे सन्निध जें ॥ ३ ॥ तया पेडग्रामांतरीं । सभाग्य-द्विजाचे उदरीं । जन्मले महाराज साक्षात्कारी । नाम ज्यांचें रामचंद्र ॥ ४ ॥ अविधाचे पदरीं । होती तयांना चाकरी । परी स्वस्थता अंतरीं । किमपीहि नसे जयांच्या ॥ ५ ॥ पराचें होणें नोकर । म्हणजे देह विकणें साचार । स्वातंत्र्य न राहे तिळभर । धिक् धिक् जिणें तयाचें ॥ ६ ॥ स्वातंत्र्याचा अभाव । त्यासी न पावे कदा देव । सच्चिदानंद पंढरीराव । परब्रह्म परमात्मा ॥ ७ ॥ याचा विचार क्षणक्षणां । रामचंद्र करिती जाणा । पारतंत्र्यता सज्जनांना । मृत्युहून आगळी ॥ ८ ॥ ती शृंखळा तोड-ण्यासी । विचार करिती मानसीं । तों अघटित एके दिवशीं । घडून आलें तें ऐका ॥ ९ ॥ प्रातःसमई संध्यास्नान । करूनियां देवतार्चन । करीत असतां पाचारण । आलें नबाबाचें तया ॥ १० ॥ एवंच त्यांचा निरुपाय झाला । पूजा न गेली सांगतेला । करून वंदन देवाला । जाते झाले कचेरीस ॥ ११ ॥ काम होतें तें सारिलें । रामचंद्र गृहीं आले । देवापुढें उभे ठेले । बद्धांजली करूनी ॥ १२ ॥ कानांत होती लेखणी । ती ठेविली विठ्ठलचरणीं । राजीनामा लिहूनी । देते झाले नौकरीचा ॥ १३ ॥ मुखें म्हणती देवदेवा । हे सच्चिदानंद केशवा । सुरमर्दना वासुदेवा । उद्धार माझा होय कैसा ॥ १४ ॥ येऊन या नर-तनूसी । व्यर्थ भुललों प्रपंचासी । अंतीं यमलोकासी । कोण तारील मजलागीं ॥ १५ ॥ तुझ्या प्राप्तीवांचून । अवघें कर्म आहे शीण । चुकीव माझें जन्ममरण । मायबापा विश्वंभरा ॥ १६ ॥ ऐसें उदेलें

वैराग्य । कोठून प्रपंचाची आशा मग । पत्नीलागीं सवेग । माहेरासी पोहोंचविलें ॥ १७ ॥ करण्या मनाची एकाग्रता । रामचंद्र निघाले तत्वतां । अंबे जोगाईचा रस्ता । नीट धरिला दक्षिणेसी ॥ १८ ॥ अंबे जोगाई महाक्षेत्र । वाराणसीसम पवित्र । जोगेश्वरी राहिली तेथ । अष्टभुजा नारायणी ॥ १९ ॥ त्या जोगाई अंब्यांत । अनुष्ठान मांडिलें सत्य । जागा निरामय एकांत । पाहोनियां बुट्टेदरडी ॥ २० ॥ या बुट्टेदरडीवरी । कीर्र झाडी नानापरी । वृक्षांची न करणे खरी । गणती मजला श्रोते हो ॥ २१ ॥ तैशाच नानाजाती लता । पार न लागे वर्णितां । वन्यपशू भक्ष्याकरितां । निर्भय हिंडती काननीं ॥ २२ ॥ ऐशा भयंकर काननीं । रामचंद्र बैसले अनुष्ठानीं । पद्मासन घालुनी । पुरश्चरण आरंभिलें ॥ २३ ॥ परी न पावे भवानी । आदिमाया प्रणवरूपिणी । जी जगत्रयाची स्वामिनी । चिच्छक्ति कालिका ॥ २४ ॥ तेणें मस्त झाले चित्तीं । निष्ठुर झाली आदिशक्ती । मग या पातकी जीवाप्रती । ठेऊं कशाला निरर्थक ॥ २५ ॥ ऐसें म्हणून प्राणासी । देण्या एका कड्यासी । रामचंद्र वेगेंसी । आले जीविता कंटाळून ॥ २६ ॥ ॐ नमः शिवाय म्हणून । उडी घेतली कड्यावरून । आतां इकडे वर्तमान । काय झालें तें ऐका ॥२७॥ जोगेश्वरी अंबा कालिका । मातंगवाल्या झाली देखा । रक्षणा आपुल्या बालका । पहा केवढी दयाळु ॥ २८ ॥ तिनें उभारून दोन्ही कर । रामचंद्र झेलिले वरच्यावर । जैसा चेंडू झेलिती पोर । अचुक नेमका खेळतां ॥ २९ ॥ रामचंद्र ह्मणती तियेसी । त्वां कां धरिलें सांग मजसी । माझ्या प्राणांत समयासी । कां आणिला अडथळा ॥ ३० ॥ तूं कोणाची आहेस कोण । येथें येण्याचें प्रयोजन । काय तें सांग मजलागून । वेळ उगा करूं नको ॥ ३१ ॥ देवी बोले त्यावरी । मी मातंगाची कुमारी । इंधनास्तव कांतारीं । आलें होतें द्विजवरा ॥ ३२ ॥ तूं म्हणविसी ब्राह्मण । स्त्रियांसम देसी प्राण । येणें तुझें अवघें ज्ञान । कळून आलें रे मसी

॥ ३३ ॥ जे प्राणहत्यारी असती जन। त्यांचें न पहावें कदा वदन। कुंभीपाकाचा पाहुणा जाण। तो अंतीं निश्चयें ॥ ३४ ॥ तुम्ही गुरु चहुवर्णांचे। अग्रस्थान पावला साचें। रहस्य न जाणितां वेदाचें। वेड्यापरी करितसां ॥ ३५ ॥ जरी वेड्या दिला प्राण। तरी न चुके जन्ममरण। ही योनी टाकून। जन्मशील दुसऱ्या योनीमध्यें ॥ ३६ ॥ ज्याचें न जाहलें चित्त स्थिर। त्यासी न भेटे परमेश्वर। हें वेदांताचें सार। हें न कैसें जाणसी ॥ ३७ ॥ ऐसें ऐकतां तद्भाषण। रामचंद्र झाले खिन्न। मातंग जातीस एवढें ज्ञान। कैसें आलें कळे ना ॥ ३८ ॥ ऐसें तयासी बोलून। अंबा पावली अंतर्धान। अंबालया लागून। येते झाले रामचंद्र ॥ ३९ ॥ जगदंबेच्या समोरीं। बैसले महाराज बद्धकरीं। व्याकूळ होऊन अंतरीं। स्तवन करिती देवीचें ॥ ४० ॥ तों जोगेश्वरी प्रगटली तेथ। दर्शन द्याया भक्ताप्रत। रूप मनोहर अत्यंत। रतीहूनी आगळें ॥ ४१ ॥ ऊठ ऊठ हे कुमारा। रामचंद्रा गुणागारा। आतां दुःख न करीं जरा। प्रसन्न झालें मी तुसी ॥ ४२ ॥ अपेक्षित मागें वर। देण्यास मी सिद्ध साचार। कृपा करण्या तुझ्यावर। प्रकट झालें राजसा ॥ ४३ ऐसें परिसतां भाषण। रामचंद्रें उघडिले नयन। देवी सन्मुख पाहून। आनंदित जाहला ॥ ४४ ॥ जेवीं दरिद्र्यासी धन लाधतां। किंवा रोगियासी आरोग्य होतां। गर्भधारणा पाहतां। वांझ जेंवी आनंदे ॥ ४५ ॥ तैसा आनंद अत्यंत। झाला रामचंद्राप्रत। होऊ-नियां सद्गदित। चरण धरिले देवीचे ॥ ४६ ॥ सर्व पूज्य जगदंबा। आदिमाया सकलारंभा। मर्दिलें शुंभनिशुंभा। त्वांच माते भवानी ॥ ४७ ॥ महा दुष्ट महिषासुर। त्वांच वधिला साचार। चंद्रहास राजावर। कृपा केली कालिके ॥ ४८ ॥ त्याचें स्मरण करावें। या दासा उद्धरावें। भवसिंधूच्या पार न्यावें। ठाव द्यावा वैकुंठीं ॥ ४९ ॥ धन्यधन्य आजिचा दिन। पाहिले तुझे दिव्यचरण। तव पदकमळीं माझें मन। भ्रमर होऊन राहो सदा ॥ ५० ॥ ऐसें विनविता देवीसी।

# वर्गणीदारांकरितां

१ श्रीसाईलीलेचा वर्षारंभ चैत्र महिन्याचे अंकापासून आहे. नवीन वर्गणीदारांस वर्षारंभापासून अंक घ्यावे लागतील.

२ पत्ता बदलणें झाल्यास लगेच आम्हांस कळवावें. बदललेला पत्ता न कळविल्यामुळें कित्येक वेळां अंक गहाळ होतात.

३ अंकासंबंधीं पत्रव्यवहार आमचेकडे करावा.

४ लेखासंबंधी पत्रव्यवहार संपादक व प्रकाशकांकडे करावा.

# वार्षिक वर्गणी.

वार्षिक वर्गणी टपाल खर्चासह मनिऑर्डरनें आगाऊ रु. ३।=, व्ही. पी. नें रु. ३॥, पुटकळ अंक ।=, मागील अंकास शिल्लक असल्यास ॥-

व्यवस्थापक—**श्रीसाईलीला**

# लेखकांकरितां

१. श्रीसाईलीलेंत प्रसिद्धीसाठीं पाठविलेला लेख अथवा कविता कागदाच्या एका बाजूवर, मार्जिन सोडून, सुवाच्य बालबोध लिपींत असावी. पेन्सिलीनें किंवा कागदाचे दोन्हीं बाजूस लिहिलेला मजकूर छापण्यास फार त्रास पडतो.

लिखाणासोबत पूर्ण नांव व पत्ता दिला पाहिजे. नांव प्रसिद्ध न करितां टोपण नांवाखालीं प्रसिद्धी द्यावयाची असल्यास त्याप्रमाणें कळवावें.

३. लेख अथवा कविता हातीं आल्यानंतर १ महिन्यांत पसंती अगर नापसंती कळविली जाईल. पसंती कळविल्यानंतर, आम्हांला कळविल्याशिवाय लेखकांनीं तो मजकूर दुसरीकडे छापविण्यास देऊं नये.

४. लेखांत योग्य तो फेरफार करण्याचा अधिकार आमचेकडे राहील. येईल तसा शब्दशः प्रसिद्ध करण्याची हमी आम्हीं घेत नाहीं.

५. लेखासोबत पुरेसें पोस्टेज आल्यास, नापसंत लेख परत करूं.

प्रकाशक **श्रीसाईलीला**

'दक्षिणा प्राइज कमिटीने बक्षीस दिलेला व केसरी, चित्रमयजगत्, ज्ञानप्रकाश, विविधज्ञानविस्तार, व रत्नाकर वगैरे वृत्तपत्रें व मासिकांनी उत्कृष्ट अभिप्राय दिलेला असा संतकवि ह. भ. प. श्री दासगणू महाराज यांनी नवीन रचिलेला व प्रोफेसर श्री. नी. चाफेकर, M. A., LL. B. यांनी प्रस्तावना लिहिलेला नवीन ग्रंथ

श्री पासष्टी–भावार्थ दीपिका

हा नरेंद्र बुक डेपो दादर, मुंबई येथे मिळेल.

कापडी पुट्ठा १० आणे. साधी प्रत ८ आणे

सर्व प्रकारचे मेंदूचे विकारांवर आणि व मानसिक श्रम करणाऱ्यांस अत्यंत उपयोगी

नकलीपासून ] ब्राह्मी तेल [ सावध रहावें.

बाळबाळंतिणीकरितां औषधें

बाळंत काढा नं. १ पहिल्या दहा दिवसांत ८१४; बाळंत काढा नं. २ दहा दिवसानंतर ८१४; बाळकडू—जन्मल्यापासून देण्यास योग्य ८८; कुमारी आसव लहान मुलांकरितां ८१२.

सतत २५ वर्षे लोकादरास पात्र झालेलें, कोणत्याही ऋतूंत घेण्यास योग्य, अत्यंत मधुर व आरोग्यदायक

पूर्ण रतल १।८।० ) द्राक्षासव ( अर्धा रतल ८१४
पाव रतल ८८ ट. ख. नि.

शिवाय आमचे कारखान्यांत शास्त्रोक्त तयार केलेले काढे, आसवें, अरिष्टें, भस्में वगैरे ५०० वर औषधें तयार आहेत. त्यांचे माहितीचा मोठा कॅटलॉग व प्रकृतिमान कसें पाहावें याकरितां "[illegible]" हा सात आण्याची तिकिटें आली असतां पाठवूं.

दत्तात्रय कृष्ण सांडू ब्रदर्स आयुर्वेदीय कारखाना, चेंबूर जि. ठाणें.

टे. नं. ८३०२४ X [illegible]. दुकान दवाखाना, ठाकुरद्वार, मुंबई नं. २

पुणें:—श्री साईनाथ आणि कंपनी.

हें पुस्तक श्रीलक्ष्मीनारायण छापखाना, ३६४ ठाकुरद्वार, मुंबई येथें अनंत आत्माराम मोरमकर यांनी छापून रा. आ. तर्खडकर यांनी ५, सेंट [illegible] रोड, बांद्रे येथे प्रसिद्ध केलें.